# दत्तकपणा 2

मी…थोड्या उशीराने. कोणी हिंसक आमच्याकडे होता, तो फारच हिंसक होता आणि त्यावेळी मला जावे लागले, कारण ती फारच अपायकारक गोष्ट होती. मिशिगनमधून सर्वांना बाहेर घालवले गेले, त्यामुळे शहराच्या मुख्य अंमलदाराला बोलाविण्यात आले, कारण, ते फार, फारच वाईट झाले होते. आता, परंतु ते सर्व काही—सर्वकाही ठीक होत आहे. सर्व काही नियंत्रणाखाली आले आहे, व आता ते ठीक आहे. जेव्हा प्रभू येईल, सर्व काही मग नियंत्रणाखाली असेल, नाही का? ओह, तो—तो चांगला आहे; आणि त्याच्या चांगुलपणाचा आणि दयेचा विचार केला तर, तो आमच्यासाठी किती महत्त्वाचा आहे, आणि त्याची स्तुती किती मौल्यवान आहे.

तसेच, आम्ही सुरुवात करण्याचा प्रयत्न केला व म्हटले की, आम्ही इफिसकरास पत्राचे पहिले तीन अध्याय घेऊ या. आणि मला वाटते आम्हांला पहिले तीन शब्द मिळाले, किंवा पहिले तीन *असे काही* मिळाले. आम्ही पुढे खोलवर गेलो नाही, परंतु आज रात्री आम्ही अजून पुढे जाण्याचे धाडस करु शकतो. आता, मी हे सांगू इच्छितो की, कोणत्याही प्रकारे मी बायबलचा एक विद्यार्थी नाहीए, आणि दैवी अभ्यासकांपासून तर फार दूरच आहे, परंतु मी—मी प्रभूवर प्रेम करतो, आणि मला त्याची सेवा करणे आवडते…(एक भाऊ ब्रदर ब्रॅन्हमशी बोलतात—समा.)

कोणीतरी, निकडीच्या प्रसंगाबद्दल, म्हणाला, आता आम्ही पुढे जाण्यापूर्वी, लुई विले येथील एका इस्पितळात लहान मुलगी आहे, आणि उत्तम विशेषतज्ञ यांनी तिची आशा सोडली आहे, आणि आता ती मरत आहे, आणि या मुलीसाठी त्यांनी विनंती केली आहे. एका ख्रिस्ती यां नात्याने हे आपले कर्तव्य आहे की, आता आपल्या माना झुकवाव्या, प्रार्थनेसाठी.

आमच्या कृपावंत प्रभू, हे फक्त आमचे कर्तव्य नाही, परंतु ही आमच्यासाठी संधी आहे, आणि आमची—आमची इच्छा आहे की, एक मंडळी म्हणून आम्ही आमचे डोके लववितो, एक बोलाविलेल्यांचा समुह म्हणून आज रात्री विश्वास करणारे लोक, तुझे वचन शिकण्यासाठी, शरीरामध्ये आम्हाला आमच्या स्थानी ठेव, जे आमच्याशी संबंधीत आहे, आणि जेथे आम्ही उचित असे ख्रिस्ताच्या शरीरातील एकत्रित झालेले कार्यशिल अवयव बनावे.

2 आणि आता आम्हाला ह्यासाठी पाचारण्यात आले आहे की, आम्ही लगेच देवाकडे जावे आणि आमच्यातील प्रत्येक वडील विचार करतील, काय आमची ही लहान मुलगी असती तर, कसे आमचे हृदय आतल्या आत जळले असते, व दुःखी झाले असते? आणि आम्ही मंडळयांना लगेच प्रार्थना करण्यास बोलावले असते आणि काही वडीलांचे हृदय जळत आहे, त्यांना वेदना होत आहेत. हे प्रभू, तो पवित्र आत्म्याचा महान व्यक्ति आता त्या वडिलांच्या हृदयात येवो. प्रत्येक संशयाची छाया, आणि प्रत्येक वेदना, काढून टाको, आणि त्याला ते कळून येऊ दे की, तू देव आहेस आणि तुझ्या उपस्थितीत तेथे कोणतेच आजार उभे राहू शकत नाही. जेव्हा तुझी सोपवलेली दैवी कामगिरी तुझे लोक व तुझ्या मंडळीकडून पूर्ण होते.

3 आणि या आठवड्यात आम्ही प्रार्थना करीत, गेल्या रविवारपासून मी या मार्गाविषयी किंवा या प्रार्थनेचा अर्थ यावर विचार करीत होतो. आमच्याकडे पुष्कळअसे हत्यार नाहीत, जसे आम्ही जगाकडे पाहीले तर, परंतु ही लहान गोफण प्राणघातक ठरते, जेव्हा ती

विश्वासाच्या बोटांनी पकडली जाते. हो प्रभू, आमच्या प्रार्थना त्या घरात पोहचो, जो मृत्यु पलिकडे त्याच्यावर टांगलेला आहे, तो छिन्नभिन्न होवो; तो काळोख, अंधार, त्या तान्ह्या बालकाच्या, बिछान्यापासून हटो. ते मूल किंवा बाळ, लहान मुलगी ह्यापासून आणि देवाच्या उपस्थितीचा महान प्रकाश त्यांच्यावर प्रकाशो. असे होवो की, ते बाळक हॉस्पिटलमधून, आरोग्यसंपन्न असे बाहेर निघो.

4 परमेश्वरा, आम्ही हे जाणतो की, त्या नदीच्या पलीकडे जेथे आमचे प्रियजन वाट पाहत आहेत, आणि ते फार गौरवी असेल, परंतु आम्ही आमच्या छोट्यावर प्रेम करतो. आणि प्रभू, आम्ही प्रार्थना करतो की, तू तुझ्या गौरवासाठी, त्या बालकाला जीवन दे. आम्ही तुझी मंडळी, त्या मृत्युला धमकावितो, आणि म्हणतो, "तू तेथेच पलीकडे थांब. तू त्या मुलीला घेऊ शकत नाही, कारण आम्ही तिचे जीवन देवाच्या राज्याखातिर दावा करतो." हे प्रभू, असे होऊ दे, सरळ जाऊन त्या चिन्हापर्यंत त्या मार्गाने पोहचो, जसे आम्ही म्हटले. हे येशू ख्रिस्त जो आमचा मुक्तिदाता त्याच्या नावाने मागतो. आमेन.

5 काय आम्ही विश्वास करतो? मी जर ख्रिस्ती नसतो, तर मी हे ओळखले ही नसते की, मी काय करु शकलो असतो? मी जास्त वेळथांबू इच्छित नाही. जगण्यासाठी काहीही नाही, फक्त दुसर्यांना वाचवू शकेन, हेच मी जाणतो.

6 आता, आज रात्री मी एक पार्श्वभूमी मांडण्यास सुरुवात करीत आहे, आपल्या मागील धड्याकडे आणि मी वाचण्याचा प्रयत्न करीन, कारण, संपूर्ण अध्याय, जर आज रात्री मी घेऊ शकलो. तर म्हणून रविवारी सकाळी व संध्याकाळी मी त्यावर जोर देण्याचा प्रयत्न करीन. जर ते योग्य असेल, यासाठी की, मंडळीने जे पाहावयास हवे त्यासाठी ती सज्ज व्हावे. ओह, हे फार गौरवी आहे की, आम्हाला आमचे स्थान सापडावे! आणि कोणीही काही करु शकत नाही, जिथपर्यंत तुम्ही काय करता हे योग्य प्रकारे जाणत नाही.

7 काय जर तुमच्यावर...शस्त्रक्रिया करण्यात आली, आणि तेथे एक तरुण डॉक्टर होते, जे नुकताच आपला अभ्यासक्रम समाप्त करुन आले होते व त्यांनी...कधीही शस्त्रक्रिया पूर्वी केलेली नव्हती. तरी, तो एक तरुण व देखणा आहे, आणि त्याचे केस सरळ विंचरलेले, आणि त्याचा पेहराव एकदम उत्तम, सर्वकाही निटनेटके, आणि तो म्हणाला, "मी सुऱ्यांना धार केलेली आहे, आणि सर्व गोष्टी व साधने निर्जंतुक केलेली आहेत." परंतु तुम्हाला त्याविषयी मजेशीर अशा भावना येतील; त्याऐवजी अनुभवी डॉक्टर असता तर बरे होते, जो शस्त्रक्रियेच्या अनुभवांतून पुष्कळ वेळापूर्वी, गेलेला आहे. मी कापण्याअगोदर. मला—मला असा एक व्यक्ति हवा, जो नुकताच शिक्षण पूर्ण केलेला नको, तर मला पाहीजे असा व्यक्ति ज्याला काही अनुभव आहे.

8 आणि उत्तम अनुभव घेतलेला असा कोणी एक मला माहीत आहे, त्याला आज रात्री मी बोलावितो. तो पवित्र आत्मा आहे. तो देवाचा महान वैद्य आणि महान गुरु आहे.

9 आणि आज रात्री माझ्या संदेशाची पार्श्वभूमी मांडत आहे, रविवारच्या प्रवचनाला धरुन...प्रभूचे वचन जे शमुवेलाकडे होते, ते त्यांनी नाकारले; आणि शौलाला स्विकारले, जो किशाचा पुत्र होता; आणि शमुवेलास नाकारले, जो पवित्र आत्म्याचा दर्शक होता, कारण तोच आत्मा चालवी, तसे बोलत होता. आणि जेव्हा त्याने त्यांचे लक्ष वेधून घेतले, तो म्हणाला, "आठवण करा, मी प्रभूच्या नावाने तुम्हाला काहीतरी सांगितले नाही, तर जे प्रभूने घडवून आणले तेच. मी तुमच्यासमोर कधी गैरशिस्त चाललो नाही. आणि कोणीही मला पापाबद्दल दोष लावू शकत नाही."

जसे येशूने म्हटले, "मला कोण पापाबद्दल दोष लाविल?" पाहा?

10 आणि तो पुन्हा म्हणाला की, "मी तुम्हाकडे येऊन कधी पैशासाठी वैगरे विनंती केली नाही. मी तुमच्यापासून काही घेतले नाही. परंतु सर्व जे मी तुम्हाला सांगितले, ते तुमच्या भल्यासाठी, आणि मी देवाच्या मुखातून जे आले, ते तुमच्याकडे पोहचवले आहे."

11 आणि सर्व लोकांनी आपल्या साक्षीचे निवेदन केले, "हे खरे आहे. हे सर्वकाही खरे आहे; परंतु तरीही आम्हाला राजा हवा आहे. आम्हाला जसे बाकीचे जग आहे, तसे व्हावे अशी इच्छा आहे."

12 आता, आज रात्री, वचनांची फोड करताना हे इफिसकरांस पुस्तक नविन करारातील यहोशवाचे पुस्तक आहे. ते विभाजन करीत आहे व इफिसकरांस पुस्तक "विजय मिळविलेल्यांमध्ये" त्यांना व्यवस्थित स्थापित करते. आता, हे फक्त काही मिनिटांसाठी मी पार्श्वभूमी देत आहे, वाचण्यास सुरुवात करण्याअगोदर जागा बनवित आहे, जेथे तिसऱ्या वचनापासून सुरुवात करुया आणि आम्हाला हे मागील रविवारी रात्री हे समजले की... जुन्या करारात देवाने इस्त्राएल लोकांना विसावा देणारी भूमी, देण्याचे अभिवचन दिले होते, कारण ते यात्रेकरु व उपरी प्रवासी होते. आणि ते त्या भूमित होते, जी त्यांची नव्हती. आणि देवाने आब्रहामाद्वारे आश्वासन दिले होते की, तो तात्पुरता मुक्काम करील. त्याचे संतान चारशे वर्ष अपरिचित लोकांमध्ये तात्पुरते मुक्कामास राहीले, आणि त्यांनी त्यांना बरोबर वागविले नाही, परंतु एका बलाढ्य बाहुने त्याने त्यांना बाहेर काढून उत्तम भूमित आणले, जी दुधामधाने वाहणारी होती.

13 आणि, आता, जेव्हा आश्वासन पूर्ण होण्याची वेळ आली, देवाने कोणाला तरी उभे केले की, त्यांनी त्या भूमिमध्ये यावे. आज रात्री किती जण अशा श्रेणीत आहेत...तो कोण होता माहित आहे? मोशे. लक्षात घ्या, एक जो खरा, त्याचा हुबेहूब दर्शक ज्याला देण्यात आलेले की, आम्हाला अभिवचनाच्या देशात आणावे, तो तर ख्रिस्त आहे. आता आम्हाकडे अभिवचन आहे, कारण आमचे अभिवचन हेच आत्मिक विसाव्याचे आहे, कुठे, तेथे शारिरीक विसावा होता! आणि म्हणून ते त्या भूमित येऊन म्हणू शकतील, "ही आमची भूमी आहे, आम्ही यापुढे प्रवासी नाहीत. तर आम्ही येथे या भूमित वसलो आहोत, ही आमची भूमी आहे, आणि येथे आम्हाला विश्रांती आहे. आम्ही येथे आमचे धान्य, पेठ, द्राक्षमळा लावू, आणि आम्ही द्राक्षमळयाचे फळखाऊ आणि जेव्हा आम्ही पुढे होऊन मरुन जाऊ, आम्ही आमच्या मुलाबाळांस ते सोडू."

14 ओह, आम्ही त्या देशात कसे जाऊ शकू, जेथे वारसाचा कायदा आहे, जसे नामी आणि रुथ, बवाज. सर्व ते परत आणा. कसे एक भाऊ जो इस्त्राएलात, कसे त्याने एक असले पाहीजे...काहीही जे त्याच्याकडून हरवले गेले आहे, ते आप्तजनाद्वारे ते परत सोडवून देणारा असावा. ओह, हे किती सुंदर आहे! हे तर आठवडेच्या आठवडे आणि आठवडेच्या आठवडे होऊनही हा अध्याय सोडून पुढे जाता येणार नाही. त्यावरच राहावे लागेल. आम्ही संपूर्ण बायबल येथे, बांधू शकतो. ह्या एका अध्यायाशी.

15 आणि, ओह, याच्यावर मी अभ्यास करणे मला आवडते. आम्ही अगोदर घेत असू, ते त्यावर एक—दिड वर्ष होऊन, ते पुस्तक सोडतही नव्हते. फक्त त्याबरोबर राहा.

16 आता, परंतु, ही एक मोठी गोष्ट होती वारसाबाबत, कसे त्या भूमितील वारसाबद्दल जेथे दुसरा कोणीही नाही, परंतु निकटचा आप्तजनच ते वारसांचे वतन सोडवू शकेल. आता, मला येथे थोडेसे चिन्ह सोडू द्या. ज्याला मी कधी रात्री, त्या विषयाविषयी थोडेसे बोललो होतो. तुम्ही जे आई आहात. किती जनांनी येथे आपल्या प्रिय व्यक्तिसाठी प्रार्थना केली, जे हरवले आहेत? ठीक आहे, तेथे तुम्ही परत आहात, समजले, "तुमचे वारसाचे वतन." पाहा?

17 पौलाने रोमी लोकांना सांगितले, “प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेव, म्हणजे तुझे व तुझ्या घराचे तारण होईल.” जर तुम्हाकडे पुरेसा विश्वास आहे, आपल्या स्वकीयांचे तारण होण्यासाठी, तेवढा पुरेसा विश्वास बाळगा. तो मुलगा, ती मुलगी, कोणत्याही प्रकारे आपल्या मार्गात भटकलेले का असेना, ते वाचले जातील. देवा, कसेही करुन कर! परमेश्वराला जर त्यांना रुग्णालयात जरी ठेवावे लागले, व मरत आहेत, ते वाचले जातील. देवाने हे अभिवचन दिले आहे. हे वारसाचे वतन आहे! ओह! “आणि ते तेथे असतील.” असे यशया म्हणाला. “आणि सर्व त्यांचे संतान त्यांच्या बरोबर असतील. माझ्या सर्व पवित्र पर्वतांत कोणी उपद्रव किंवा नाश करणार नाहीत, असे परमेश्वर म्हणतो.”

18 ओह, माझ्याकडे एक छोटे स्थान आहे. मी आशा करतो की, आज रात्री ते तुमच्यासाठी मी घेऊ इच्छितो. माझे हृदय नुसते जळत आहे, यासाठी की मी त्याकडे परत यावे.

19 परंतु आता, पुढे. मग मोशेकडे तुम्ही लक्ष लावले, जो मोठी अद्भुत चमत्कार करणारा, ज्याने इस्त्राएलाला त्या देशातून काढून आणून, आणि त्यांना अभिवचनाच्या देशात आणले, परंतु त्यांच्या वारसाच्या वतनात त्यांना ठेवले नाही? त्याने त्यांना त्यांच्या वारसाचे वतन दिले नाही. त्याने त्यांना मार्ग दाखवित त्या भूमित घेऊन गेला. परंतु यहोशवाने त्या देशाची वाटणी केली, काय हे बरोबर आहे ना? आणि ख्रिस्ताने मंडळीला त्या स्थळी आणले, जेथे त्यांना त्यांच्या वारसाच्या वतनाचा ताबा दिला गेला, फक्त यार्देन पार करायची होती, परंतु तो एक पवित्र आत्मा आहे, जो मंडळीला योग्य स्थळी व्यवस्थेत वसवितो. आजचा यहोशवा हा मंडळीला व्यवस्थेत आणतो. प्रत्येकांना दाने, स्थान, पद देतो आणि ती देवाची वाणी आहे जी बोलते, त्या आतील मनुष्याकडून ज्याला ख्रिस्ताने वाचविले आहे, तो पवित्र आत्मा. आता तुम्हाला तो भरपूर मिळाला आहे का? आता आम्ही इफिसकरांस पुस्तकात जाऊया. आता त्याचप्रकारे, तो मंडळीला त्यांच्या स्थानी वसवत आहे. जेथे ते असले पाहीजेत. आता, यहोशवाने त्यांना नैसर्गिक देशात वसविले. आता पवित्र आत्मा मंडळीला त्या देशात, त्या स्थानी वसवत आहे. यासाठी की, त्यांचे वारसाचे वतन जे त्यांचे आहे, त्यात ते वसावे.

20 आता, जी पहिली गोष्ट त्याने सुरुवात केली होती, त्याने त्या पत्रात “पौल” असे दर्शविले. थोड्याच वेळात आम्ही ते पाहणार आहोत की, ही सर्व रहस्ये त्याला प्रकट करण्यात आली, सेमेनरितून नाही. ना कोणा दैवी अभ्यासकाकडून, परंतु देवाने पौलाला ते दैवी प्रकटीकरण पवित्र आत्म्याद्वारे दिले. हे समजून की देवाचे रहस्य. तो म्हणाला, हे जगाच्या स्थापनेपासून लपविण्यात आले होते, ते पवित्र आत्म्याद्वारे त्याच्यावर प्रकट केले गेले आणि पवित्र आत्मा त्या लोकांमध्ये प्रत्येकांना त्यांच्या जागी सुव्यवस्थित वसवितो, मंडळीला तिच्या पदी स्थापितो.

21 आता, पहिली गोष्ट पौल लोकांना सांगण्यास सुरुवात करतो...आठवण ठेवा, हे मंडळीसाठी आहे, बाहेरच्यांसाठी नाही. ते रहस्य त्याच्यासाठी न उकलणारे कोडे आहे. कधीच न समजणारे, त्याच्या डोक्यावरुन जाते, कशाशिवाय काहीच माहीत नाही, असे त्याचे असते! परंतु, मंडळीला खडकातील मध, अवर्णनीय आनंद, हे धन्य खात्री आहे. हे जीवाचा नांगर आहे, ते आमचा आनंद ज्यात आम्ही राहावे असे ठिकाण युगानुयुगांचा खडक आहे. ओह, ते सर्व काही चांगलं ते आहे; कारण स्वर्ग आणि पृथ्वी नाहीतशी होतील, परंतु देवाचे वचन कधीच नाहीशे होणार नाही.

22 परंतु मनुष्य जो कनानाच्या बाहेरील व्यक्ति या विषयी काहीच जाणत नाही, तो अजूनही भटकत आहे. मी हे नाही म्हणत आहे की, तो चांगला मनुष्य नाहीए. मी हे

नाही म्हणत की, जो मिसरात आहे, तो चांगला मनुष्य नाही, तो आहे, जोपर्यंत तो याचा ताबा घेत नाही.

23 आणि तो मालकी हक्क, ते, आश्वासन जे मंडळीला देण्यात आले, ते नैसर्गिक देश नाही. परंतु आत्मिक देश, कारण आम्ही राजकीय याजक आहोत, एक पवित्र राष्ट्र. त्या राजकीय याजकत्वात, पवित्र राष्ट्र, मौल्यवान लोक, पाचारण केलेले, निवडलेले, पसंत केलेले, वेगळे केलेले, मग सारे जग हे बाहेर तर मृत्युमुखी पडलेले आणि आम्ही आत्म्याद्वारे चालविले जातो. देवाचे पुत्र आणि कन्या देवाच्या आत्म्याने चालविले जातात; मनुष्याद्वारे नाही, परंतु आत्म्याद्वारे.

24 सर्व प्रेमात, सर्व काही आता, त्यांत गाठोडे बांधले जाते. याविषयी पुष्कळवेळा शिकविण्याचा प्रयत्न केला आहे, आणि यात संशय नाहीए की, कितीही मोठ्या दैव अभ्यासकांनी माझ्यापेक्षाही खूप खोलवर प्रहार केला आहे. परंतु जी गोष्ट मला वाटते की, प्रयत्नांनी तुमच्याकडे आणावी ती ही आहे, एक मनुष्य जो ख्रिस्तात आहे, पवित्र आत्म्याने तो चुकीच्या व्यक्तिला सहन करु शकतो. सहनशीलता, लीनता, धीर. कारण तो गोड, नम्र, विश्वासयुक्त आत्म्याने भरलेला, कधीच नकारात्मक नाही, सर्वदा होकारार्थी, तो एक वेगळाच व्यक्ति आहे.

25 तो फक्त एक मनुष्य नाही, "आम्हाकडे ते पहिले होते. आम्ही जर किंचाळलो तर, आम्हा मेथोडिस्ट्सना तो आहे. ओह, जेव्हा आम्ही किंचाळतो, तेव्हा आम्ही भूमीत आहोत." ते बरोबर आहे, ठीक आहे, मी ही तसाच विश्वास करतो.

26 तेव्हा पेन्टिकॉस्टल हे अन्य भाषा बोलत आले, "त्यांना मिळाला; प्रत्येकजण जे अन्य भाषेत बोलतात, त्यांना तो मिळाला." मी ही, तसाच विश्वास करतो. परंतु तुम्ही पाहा, अजूनही आम्हाला सापडतात, बहुतेकांना तो मिळालेला नाही. पाहा? आता ते...

27 आता आम्ही त्या महान लपलेल्या रहस्याकडे येतो, जी गुजे जगाच्या स्थापनेपासून लपलेली होती आणि आता देवाच्या पुत्रांना या अंतिम समयात प्रकट केलेली आहेत. तुम्ही विश्वास करता की, ते खरे आहे. की देवाचे पुत्र प्रकट झालेले आहेत? आम्ही अजून कुठे वळण्याअगोदर, आपण रोमकरांस पत्रात 8व्या अध्यायात एका क्षणासाठी वळूया. मला तुमच्यापुढे हे वाचू द्या. पाहा, जर हे येत असेल जे, मी येथे बोलत आहे त्याविषयी. आता रोमकरांस पत्र 8वा अध्याय, 19वे वचन, रोमकरांस पत्राच्या 8व्या अध्यायातून.

> *कारण* सृष्टी...*देवाच्या पुत्रांच्या* प्रकट *होण्याची प्रतिक्षा अत्यंत उत्कंठेने करीत आहे.*

28 तीव्र अपक्षेने, संपूर्ण सृष्टी प्रकट होण्याची प्रतिक्षा करीत आहे. पाहा, प्रकटीकरण! प्रकटीकरण कसले? माहीत होणे!

29 संपूर्ण जग. तेथे मुसलमान पलिकडे, याची प्रतिक्षा करीत आहेत. सर्वत्र, सगळीकडे, ते शोधत आहेत. "हे लोक कुठे आहेत?"...आमच्याकडे...आमच्याकडे सुसाट्याने वाहणारा वारा होता, आमच्याकडे मेघगर्जना व विजांचा लखलखाट होता, आमच्याकडे तेल व रक्त होते, सर्व प्रकारच्या गोष्टी होत्या; परंतु आम्ही ती मंद वाणी ऐकण्यास अपयशी ठरलो आहोत—ज्याद्वारे संदेष्टा आकर्षित झाला, त्याद्वारे झगे त्याच्या सभोवती गुंडाळले आणि ते निघून गेले, म्हणाले, "प्रभू, मी येथे आहे" पाहा?

30 आता संपूर्ण सृष्टी ही वेदना भोगित देवाच्या पुत्राची प्रकट होण्याची वाट पाहत आहे. आता, पौल मंडळीला तिच्या संबंधित ठिकाणात पहीले स्थापित आहे, जे तिच्यासाठी आहे. आता त्याची पार्श्वभूमी समजण्यासाठी, पुन्हा ते वाचूया.

*इफिस येथील पवित्रजन* (हेच ते “संतजन”) *व…ख्रिस्त येशूच्या ठायी विश्वास ठेवणारे ह्यांस देवाच्या इच्छेनुसार झालेला ख्रिस्त येशूचा प्रेषित, पौल ह्यांच्याकडून.*

31 आता, म्हणूनच विद्यार्थ्यांनो हे विसरु नका की, आम्ही ख्रिस्तामध्ये कसे येतो? चर्चला सामिल झाल्याने आम्ही ख्रिस्तामध्ये येतो काय? ख्रिस्तात दाखल होण्यासाठी काय आम्ही काही कार्य करावे? काय ख्रिस्तामध्ये दाखल होण्यासाठी आम्हाला पाण्यात बुडविले पाहीजे काय? आम्ही ख्रिस्तामध्ये कसे दाखल होऊ शकतो? पहिले करिंथकरास पत्र, 12वा अध्याय “एका आत्म्याद्वारे,” एका, आत्मा हा शब्द मोठ्या अक्षरात. त्याचा अर्थ पवित्र आत्मा, “आम्ही सर्व त्या वचनदत्त देशात बाप्तिस्मा पावलो आहोत.”

32 या वचनदत्त देशात, सर्वकाही आमच्याशी संबंधित आहे या वचनदत्त देशात. पाहा, भाऊ कॉलिन्स? पाहा, सर्वकाही या वचनदत्त देशामध्ये! जेव्हा इस्त्राएल यार्देनेच्या या पलिकडे गेले, वचनदत्त देशात, सर्व गोष्टींसाठी त्यांना लढावे लागले!

33 आता आठवण ठेवा, या वचनदत्त देशामध्ये, याचा अर्थ असा नाही होत की, तुम्ही आजारापासून मुक्त झाला, याचा अर्थ असा नाही होत की, तुम्ही त्रासापासून मुक्त झाला. परंतु हे मायाजाल आहे. (ओह, हे खोलवर जाते), ते असे म्हणते की, ते तुमचे आहे! फक्त उभे राहा आणि घ्या! समजले? जेव्हा…

34 आणि, लक्षात ठेवा, एकच मार्ग होता, ज्याद्वारे इस्त्राएल आपल्या पुरुषांना गमावू शकत होता, जेव्हा तंबूमध्ये पाप सापडते. हाच एक मार्ग असू शकतो, त्याद्वारे विजय गमावू, म्हणजे पाप तंबूत प्रवेश करते, काहीतरी, कोठेतरी चुकत आहे. जेव्हा आखानाने ती विट चोरली आणि तो शिनारी झगा, तंबूमध्ये पाप सापडले, आणि युध्दात वाईट घडले.

35 आज रात्री तुम्ही मलाही मंडळी द्या, या लोकांचा समुह, पूर्णतः, संपूर्ण त्या देवाच्या अभिवचनामध्ये, पवित्र आत्म्यानिशी, आत्म्यात चालण्याद्वारे, मग कोणतेही आजार किंवा दुखणे असो, मी आव्हान करतो काहीही असो, प्रत्येक ज्योय लुवासू या देशात असो, जो ख्रिस्तत्वाला मानणारा असो आणि सर्व अविश्वासी जे तेथे आहेत, आजारी व दुखणेकरी यांना या दारात घेऊन या, आणि ते तेथून पूर्णतः बरे होऊन जावोत. होय, महाशय, देवाने आश्वासन दिले आहे, फक्त अविश्वासाचे पाप ते आमच्यापासून दूर ठेवते. आता थोड्या वेळानंतर, आम्ही हे लहानसे पाप काय आहे ते पाहणार आहोत, आता.

…जे *ख्रिस्त येशूमध्ये आहेत.*

*देव आपला पिता, व…प्रभू येशू ख्रिस्त ह्यांच्यापासून तुम्हाला कृपा व शांती* असो.

*आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता, धन्यवादीत असो. त्याने स्वर्गातील सर्व अध्यात्मिक आशीर्वाद देऊन आपल्याला ख्रिस्तामध्ये आशीर्वादीत* केले *आहे.*

36 जेव्हा आम्ही ख्रिस्तामध्ये आहोत, तेव्हा आम्हाला आत्मिक आशीर्वाद आहेत. ख्रिस्ताच्या बाहेर, आम्हाकडे फक्त संवेदना आहेत. ख्रिस्तामध्ये आम्हाकडे आशावादी आशीर्वाद आहेत. बनावटी विश्वास नव्हे, शरम नव्हे, काही घालण्याने नव्हे. परंतु जितपर्यंत तुम्ही हे सांगण्याचा प्रयत्न करीत आहा की, तुम्ही वचनदत्त देशात आहा आणि वास्तविक नाहीत, तर तुमचे पाप तुम्हाला शोधून काढील. आणि, पहिली गोष्ट तुम्ही जाणता की, तुम्ही स्वतःला एका समुहात दिसाल, आणि—आणि ज्याविषयी आम्ही त्यांना या जगात

म्हणतो, घाणीचे डाग, जाळम्हणतो. तुम्हाला असे सापडेल की, ज्याविषयी तुम्ही बोलता, ते तुम्हाला मिळालेच नाही. परंतु जेव्हा तुम्ही ख्रिस्त येशूमध्ये आहात, त्याने स्वर्गीय शांतीचे, स्वर्गीय आशीर्वादाचे, स्वर्गीय आत्म्याचे आश्वासन दिले आहे. सर्व काही तुमचे आहे. तुम्ही वचनदत्त देशात आहात आणि अवघ्यांचे पूर्णतः मालक आहात. आमेन. हे किती सुंदर आहे! ओह, ह्यावर अभ्यास करु या.

*त्याचप्रमाणे त्याने निवडून* घेतले...

37 आता येथे मंडळी फार वाईट प्रकारे अडखळते.

*त्याप्रमाणे त्याने आपल्याला त्याच्यामध्ये निवडून* घेतले... (कोणामध्ये?) *ख्रिस्तामध्ये.*

38 मागे उत्पत्ती आणि प्रकटीकरणामध्ये, आम्हाला असे सापडते, प्रकटीकरण 17:8, त्याने जगाच्या स्थापने अगोदर ख्रिस्तामध्ये आम्हाला निवडले. आता, ते वचन...मला पुढे ते वाचू द्या.

*...जगाच्या स्थापनेपूर्वी, त्याप्रमाणे आपण त्याच्या समक्षतेत पवित्र व निर्दोष असावे...*

*पूर्वीच नेमले होते...*

39 आता, मला "पुर्व नियुक्त" या शब्दाकडे थांबावे असे वाटते. आता *पूर्वनियुक्ति* अशी म्हणत नाही की, "मी भाऊ नेव्हिल याला निवडतो आणि मी—मी—मी—मी—मी भाऊ बिलर याला निवडत नाही." ते असे नाहीए. ते देवाचे पूर्व ज्ञान आहे. ज्याद्वारे त्याला माहीत आहे की, कोण बरोबर आहे आणि कोण बरोबर नाही. म्हणून, देवाच्या पूर्व ज्ञानाद्वारे, जाणतो की, तो काय करणार आहे, त्याने पूर्व नियुक्ती करुन त्याच्या पूर्व ज्ञानाद्वारे देवावर प्रेम करण्यासाठी सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक ठरतील, ह्यासाठी की येणाऱ्या, युगात त्याने ख्रिस्त येशूमध्ये बोलावून सर्व काही एक करावे.

40 मला येथे तुम्हाला स्पष्टीकरणात्मक चित्र काढू द्या. हे चांगले आहे. आम्ही मागे जाऊया, मला वाटते मी यावर थोडेसे बोललेलो आहे. मागील रात्री, किंवा त्यावर भर दिला आहे, उत्पत्तीमध्ये, 1 अध्याय, 1:26 मध्ये, जेव्हा देवाने त्याचे नाव "प्रभू देव," म्हटले, तो शब्द तर एल, एला, एलोहीम, ज्याचा अर्थ "स्व—अस्तित्वात असणारा." तेव्हा तेथे काही अस्तित्वात नव्हते. परंतु तो होता. तेथे हवा नव्हती, तेथे प्रकाश नव्हता, तेथे तारे नव्हते, तेथे जगही नव्हते. तेथे काही नव्हते. तो देव आणि एकटाच देव. एल, एला, एलोहीम. आता, त्याने सर्व उत्पन्न केले.

41 त्याच्यामध्ये गुणधर्म होते. त्याचा अर्थ असा होता की, तो एक होता...त्याच्यामध्ये तो महान एल, एला, एलोहिम, यामध्ये गुणधर्म होता, किंवा...तुम्ही जाणता की *गुणधर्म* काय असतो, किंवा मला ते अशाप्रकारे सांगू द्या, एक "स्वभाव" असतो. हे असे आहे की, लहानांतील एकाला कळते, आणि मी त्या लहानातील एक आहे. जे मला तशा प्रकारे कळले. त्याच्यामध्ये पिता बनण्याचा स्वभाव होता, परंतु तो स्वतःमध्ये अस्तित्वात आहे, त्याच्या असे काही नव्हते, ज्याद्वारे तो पिता बनू शकेल आणि, आता, त्याच्या आत खोलवर काहीतरी होते की, तो देव होता; आणि एक देव हा भजनीय आहे; परंतु तो स्वतःमध्ये अस्तित्वात असलेला, एल, एला, एला, एलोहिम, आणि म्हणून त्याची भक्ति करणारं असं कोण नव्हतं. त्याच्या आत, तो तारणारा होता, असे काही हरवले नव्हते, की जे वाचविता येईल, समजले? त्याच्या आत, तो रोग बरे करणारा होता, पाहा, परंतु तेथे असे कोणी आजारी नव्हते की, त्याला बरे करावे किंवा कोणी आजारी पडेल असे

नव्हते. आता तुम्हाला ह्या चित्राने स्पष्ट केले? म्हणून त्याचा गुणधर्म, त्याच्या स्वभावाने आज जे आहे ते उत्पन्न केले.

42 काही लोक म्हणतात, "ठीक आहे, सुरुवातीलाच देवाने का थांबविले नाही?" "तो एक निर्दय हृदयाचा दुष्ट आहे," जोई लिविस म्हणाला, ज्या एकाने जोईला दोषी ठरविले, किंवा जॅक को, पाहा. म्हणाला, "तो एक निर्दयी हृदयाचा पशुतुल्य आहे. देव नावाचे काहीही नाहीए. जर तसे काही असते,…" ओह,…त्या देवाला वेगवेगळया नावाने बोलले, समजले? परंतु हे यासाठी की, त्याला *इथे* वर खुप माहीती आहे; परंतु त्याच्या आत *इथे* काहीही नाही.

43 आता, येथे, तेथेच कोठे ते आहे, पाहा? हे वचन येथे असे सांगत आहे आणि त्याने ते लपविले आहे आणि ही रहस्ये लपविलेली होती. स्मरण ठेवा. बायबल म्हणते, "ते जगाच्या स्थापनेपासून वाट पाहत होते. देवाच्या पुत्रांचे प्रकट होण्यासाठी," ह्यासाठी की ते मंडळीला प्रकट करावे. ओह, बाप रे! तुम्हाला समजले काय?

44 आता मी माझ्या गोष्टीसाठी थोडे थांबतो. किंवा…मी माझ्या पुढच्या विचाराकडे वळतो, हे समजण्यासाठी. आता आठवण ठेवा, मोशेच्या त्या पूर्ण युगातून जाताना, संदेष्ट्यांच्या त्या मागील युगातून, त्या मागच्या युगातून, शास्त्रलेखाप्रमाणे या गोष्टी प्रदर्शित करण्यासाठी या नंतरच्या दिवसात ते थांबले. हे खरे आहे. कारण ते देवाच्या पुत्रांना प्रकट करण्यात येईल का? गमावलेल्यांतून…पिरॅमिडच्या आकाराप्रमाणे, मी अगोदर म्हटल्याप्रमाणे जवळ, जवळ, जवळबांधण्यात येते.

45 जसा कैकवेळी मी याबद्दल शेरा दिला आहे, आणि म्हणालोय, देवाने तीन बायबल तयार केले. पहिले, त्याने आकाशात स्थापले, राशीचक्र, तुम्ही राशीचक्र पाहीले आहे काय? राशीचक्राची पहीली प्रतिमा काय आहे? कन्या. शेवटची प्रतिमा राशीचक्रात कोणती आहे? सिंह. तो प्रथम कुमारी कन्याकडे आला, तो दुसऱ्यावेळी यहुदा वंशाचा सिंह म्हणून आला. समझले?

46 त्याने त्या पिरॅमिडमध्ये नंतरचे तयार केले आहे, मागील हनोखाच्या दिवसांमध्ये, जेव्हा त्यांनी पिरॅमिड बनविले आणि त्याचे मोजमाप केले. मला हे समजत नाही. परंतु युध्दासाठी, जेथे ते वाकत आणि फार वेळेपर्यंत आपल्या गुडघ्यावर राहत, आणि युध्दातले अंतराचे ते मोजमाप करीत असत. तुम्हाला माहीत आहे, कुठपर्यंत ते मोजमाप करीत? राजाच्या खोलीपलीकडे ते सरळठेवत आणि जसा जसा तो पिरॅमिड वर जाई… आम्ही आज जे काही आमच्याकडे आहे, त्याने ही बांधु शकत नाहीत. आम्ही असा बांधु शकत नाही.

47 तो त्याच्या निमूळत्या टोकापर्यंत, *असा* बांधण्यात आला. आणि त्याच्यावर धोंडे ठेऊन…कळसाचा धोंडा कधीच सापडला नाही. त्यांनी पिरॅमिडच्या टोकावर कधी वरचा भाग ठेवलाच नाही. मला हे माहीत नाही की, तुम्हाला हे माहीत आहे किंवा नाही. इजिप्तचे मोठे पिरॅमिड, त्यांच्यावर वरचा भाग ठेविलेला नव्हता. का बरे? कारण वरचा भाग जो कळसाचा धोंडा, ख्रिस्त, तो नाकारला गेला. पाहा, त्याला नाकारले गेले.

48 परंतु आम्ही जसे वाढत लुथरच्या युगांतून, बॅप्टीस्टच्या युगांत, मेथोडीस्टच्या युगांत, पेन्टीकॉस्टच्या युगांत, आम्ही आता कळसाचा धोंडा त्यांच्या जागी बसविण्याच्या वेळेत आलो आहोत, पाहा, इच्छा करीत व वाट पाहत आहोत की, तो कळसाचा धोंडा घट्ट बसविला जावा आणि बांधकाम समाप्त व्हावे. तुम्ही शास्त्रलेखात कधी वाचले नाही काय? "तो खडक नाकारला गेला."? खचितच, आम्ही हे जाणतो की, हे शलमोनाच्या

मंदिरासंबंधी बोलतो. "परंतु नाकारलेला खडकच कोपऱ्याचा मुख्य झाला." आणि मी हे सांगत आहे. यासाठी मी तुमच्या पुढे त्याचे एक—एक—एक चित्र तयार व्हावे.

49 आणि, आता बायबलमध्ये, आम्ही शेवटच्या दिवसात आहोत, त्या पिरॅमिडच्या वरती, जेथे आम्हाला राशीचक्रात जे कर्क युगांतले ओलांडले मासे दाखविते. सिंहाच्या येणाच्यावेळी, जेव्हा तो कळसाच्या धोंड्यामध्ये, आणि पवित्र बायबलमध्ये, सांगितल्याप्रमाणे देवाच्या पुत्राच्या प्रकटीकरणाच्या दिवसांमध्ये असेल. पाहा. आम्ही आता कुठे पाहोचलो आहोत? आम्ही बरोबर अंत समयात आहोत.

50 या आठवड्यामध्ये किती जणांनी वर्तमान पत्रात वाचले? क्रुशेव आणि ते याबद्दल काय म्हणाले? ओह, ते तयार आहेत; तसेच आम्हीही आमेन. पाहा ते आहे! ओह, काय—काय—काय संधी आहे. काय हा दिवस आहे! जर ख्रिस्तीजण याची जाणीव करु शकतील, ज्यात आम्ही राहत आहोत. बाप रे!

51 तुम्ही काय विचार करता? या पुस्तकाचा लेखक, ज्याने हे पाहिले, आणि ते पाहीले जे अंत दिवसात प्रकट होणार आहे, वाट पाहत कण्हत आहेत, देवाच्या पुत्रांसाठी अंतिम दिवसांत उभे राहणे, या युगाच्या अंतामध्ये जेव्हा पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याद्वारे, जगाच्या स्थापनेपासूनच्या गुप्त गोष्टी प्रकट करण्यासाठी आणि त्यांना पुढे आणण्यासाठी.

52 आता पुन्हा आपण परत जाऊ, "जगाच्या स्थापनेमध्ये" यासाठी की, आम्हाला प्रकटीकरण मिळावे, हे पाहण्यासाठी की आम्ही बरोबर आहोत किंवा नाही, मला आशा आहे की, मी देवाला "पप्पा" हाक मारल्यामुळे स्वतः अधार्मिक ठरु नये, परंतु मी त्याप्रकारे त्यासाठी बोलतोय की तुम्हाला समजावे. पप्पा! पप्पाला काही मुले हवी होती, म्हणून त्याने काय केले? त्याने म्हटले, "स्वर्गदूत बनोत." आणि ते त्याच्या सभोवती आले. ओह, ते चांगले आहे. त्यांनी त्याची आराधना केली, मग तो देव ठरला, हे त्याचे गुणधर्म होते. आठवण ठेवा, तो एल. (ई—एल) एलाहा, एलोहिम, स्वतःमध्ये अस्तित्वात असणारा, दुसरे काही नसून स्वतः पहिली गोष्ट जी आली, ती म्हणजे स्वर्गदूत मग, स्वर्गदूत आराधना भक्ती शिवाय दुसरे काही करीत नव्हते. ते नाश पावू शकत नव्हते. म्हणून, ते आजारी होऊ शकत नव्हते, ते अविनाशी व्यक्तित्वाचे होते. म्हणून, तो त्याची आरोग्य देण्याचे सामर्थ्य प्रदर्शित करु शकत नव्हता, तो त्याचे सामर्थ्य दर्शवू शकत नव्हता. म्हणूनच तेव्हा, आधीच, आता…

53 त्यानंतर तो म्हणाला, "आम्ही काही स्पर्श करण्याजोगे बनवू या." म्हणून त्याने पृथ्वी बनविली आणि जेव्हा त्याने पृथ्वी बनविली, त्याने पृथ्वीवरील सर्व प्राणी बनविले, आणि मग त्याने मनुष्याला घडविले. जे काही पृथ्वीतून वर आले; त्याची सुरुवात एका—एका जेलिफिश किंवा पॉलिवॉगसारख्या जंतूतून झाली, जणूकाही एक देहाचे स्वरुप पाण्यावर तरंगणारे, सुरुवात तेथून झाली…त्यानंतर ते बेडकात बदलले. जे सर्वात नीच पातळीचे जीवनाला दर्शविते. ते त्याचा दाव करितात की, तो बेडूक होता. उच्च पातळीत मनुष्यजात आली. बेडकांतून सुरुवात करुन ती पालीमध्ये, आणि पुढे होऊन पुढे, होऊन पालीतून बदलत गेले आणि प्रत्येक वेळी जेव्हा पवित्र आत्मा फुंकर घालीत "व्हुश," करीत जीवन परत आले; "व्हुश," करीत असता. अधिक उत्तम प्रतीचे जीवन बनले. आणि पहिली गोष्ट, ही झाली, देवाच्या प्रतिरुपाचा पुढे आला, तो मनुष्य होता. कोणीही, कधीही, उत्पन्न केला जाणार नाही, मनुष्यापेक्षा उच्च असे काही याचे, कारण मनुष्य देवाच्या प्रतिरुपाचा आहे. समजले?…

54 जेव्हा त्याने त्याच्या पहिल्या मनुष्याला घडले. आता, जेव्हा त्याने त्याच्या स्वर्गदूतांना अस्तित्वात आणले,…त्याने मनुष्य बनविला. "त्याने त्यांना नर व नारी असे

उत्पन्न केले." सर्व एकाच मापात. तो पुरुष व स्त्रीही होता, नाजुक व मर्दानी सुद्धा. जेव्हा त्याने आदामाला घडविले आणि त्याला देहधारी केले…स्मरण ठेवा उत्पत्ती 1, त्याने पुरुष व स्त्री बनविली. आणि उत्पत्ती 2मध्ये, जमिनीची मशागत करण्यासाठी अजून कोणी मनुष्य नव्हता. देहधारी मनुष्य. कोणी मनुष्य नव्हता, जो धरुन ठेवू शकेल आणि मशागत करु शकेल. परंतु त्याच्या प्रतिरुपात असलेला मनुष्य होता. "आणि देव हा एक…" (मंडळी म्हणते, "आत्मा"—संपा.) हे सत्य आहे. समजले? त्याने प्रथम मनुष्य घडला. "नर आणि नारी अशी त्याने ती अस्तित्वात आणली." आता जेव्हा त्याने प्रथम मनुष्य घडला!

55 आता, लक्षात ठेवा, त्याच्या मनात हे सर्वकाही एकत्रित होते. आणि रविवारी रात्री मी त्यावर बोललो. एक—एक शब्द हा विचाराला व्यक्त करतो. देवाने विचार केला की तो कसा देव असू शकतो, त्याची भक्ति कशी होऊ शकेल. तो कसा रोग बरे करणारा असेल? तो कसा तारणारा होऊ शकेल; आणि जसा शब्द बोलताच, ते कायम ठरते; ओह, हे जर देवाचे पुत्र आता जर देवाचे वचन जसे आहे, तसे जर पकडतील. जेव्हा देव एक शब्द बोलतो, तेव्हा ते समाप्त होते! संपूर्णतः! तो त्यासाठी थांबला असेल…काल गणना शास्त्र हे सांगत, किंवा पुरातन वस्तुशास्त्र आणि सर्व, ते असा दावा करितात की, हे जग लाखो आणि लाखो वर्षांपासून असू शकते. मला माहीत नाही कदाचित एकावर बारा शुन्य इतके वर्षापासून असेल ही. मला माहीत नाही कधीपासून हे आहे. देव हा वेळेच्या विभागात अस्तित्वात नाहीए. त्याच्याकडे एक मिनिटही कमी वेळनाहीए. जेव्हा त्याने शब्द बोलला. तो आजही देव आहे. त्याच्यासह कोणताही समय नाहीए.

56 मला हे असे कधीच माहीत नव्हते. एका रात्रीपर्यंत किंबहुना एका सकाळपर्यंत; अनंतकाळ, जेथे काल नाही; उद्या ही नाही, तेथे फक्त आता आहे. तुम्ही ह्या शब्दाकडे कधी अवलोकन केले आहे काय? "मी आहे"? "मी होता" नाही किंवा "मी असेन." तो अनंत आहे. "मी आहे!" समजले? "मी आहे," कायम!

57 आता, त्याला गोष्टी वेळेत गुंफायच्या होत्या. भक्ती करण्याजोगा काही करावे, असे वाटे, म्हणून त्याच्याठायी असलेल्या गुणधर्माने हे अस्तित्वात आणले. मग त्याने मनुष्य बनविला. मग, त्या मनुष्यामध्ये त्याला एकटेपणा दिसला. म्हणून, आता, त्याच्या महान मनात आता, काय आहे ते दाखववे. त्याच्याकडे ख्रिस्ताचे व मंडळीचे चित्र काय हे पाहावे, त्याने वेगळा असा मातीचा गोळा घेतला नाही, स्त्रीला बनविण्यासाठी, परंतु आदामाच्या कुशीतून त्याने तिला काढले, एका फासळीतून आणि आदामाच्या आत्म्यातून घेतले. जी नर आणि त्या फासळीत घातले. जेव्हा तुम्ही पुरुषाला पाहता, जो बायल्यासारखा कृती करतो, तेथे काही चुकीचे आहे आणि जेव्हा तुम्ही एका स्त्रीला पाहता जी, पुरुषासारखी कृती करु इच्छिते, तेथे काही चुकीचे आहे. ते दोन्ही वेगवेगळे आत्मे आहेत. एकदंर परंतु, एकत्रितपणे, ते एकच माप बनते. "ते दोघे एक होतील." म्हणून त्याने स्त्री आणि पुरुष बनविला आणि ते कधीही म्हातारे होणार नव्हते, कधीच मरणार नव्हते, केस पांढरे होणार नव्हते, कधीच नाही. त्यांनी खाल्ले, त्यांनी प्याले, ते झोपले जसे आम्ही करतो, परंतु त्यांना कधीच माहीत नव्हते पाप काय होते.

58 आता मी दुसऱ्या धड्याकडे वळतानाही मी येथेच ठेवतो. पुढे कधीतरी, पाहू सर्पवंशाविषयी. त्यांना याविषयी, मला आठवण काढण्यास सांगितले. परंतु मला पाहू दे, कोणी आला आणि मला काही वेगळेच दाखविले, तेच मला जाणायचे आहे समजले.

59 आता, परंतु सर्वानंतर, जेव्हा पापाचा प्रवेश झाला, काय घडले?

60 त्या दिशेला पलीकडे, दशलक्ष शंभर, दशलक्ष मैलावर, तेथे एक अंतराळ आहे. *जे* फार मोठे, आणि ते पूर्णतः आगापी प्रेम होते. प्रत्येक वेळी जेव्हा तुम्ही पावले *ह्या* दिशेने वळविता इंचागणिक अरुंद होत जाते. आणि तुम्ही जाणता की, पृथ्वीवर येण्यासाठी किती कालावधी लागतो. ते एक छायेची छाया आहे. तेच तुम्हाकडे आहे, तेच माझ्याकडे आहे, आगापे प्रेमाची छाया. छायेची छायेची छाया.

61 तेथे तुमच्यामध्ये काही आहे, तेथे प्रत्येक स्त्री मध्ये काही आहे, जी वीस वर्ष पार केलेली आहे. तेथे काहीतरी आहे. प्रत्येक पुरुषाचे वीस वर्षे पार केलेली आहेत? ते असे राहू इच्छित आहे. तुम्हाकडे फक्त पाच वर्ष आहेत. ते म्हणजे 15—20 वर्षापासून. वीस नंतर आम्ही मरण्यास सुरुवात करतो. परंतु, 15पासून, किशोरवयीन मुले असते आणि नंतर तुम्ही वीस पर्यंत जेव्हा वयात येता आणि वीस नंतर. ओह, तुम्ही म्हणता, "मी एका पुरुषाप्रमाणे बनलो आहे." तुम्ही तसे म्हणता, परंतु तुम्ही नसता. तुम्ही मरत आहात आणि जळत असता, झीजत जाता, मग तुम्ही काहीही केले, हरकत नाही. देवाने तुम्हाला त्या वयापर्यंत बनविले आहे, परंतु नंतर आमची मरण्यास सुरुवात होते, आता काय होते? आता मरण्यास सुरुवात होते, परंतु तेथे काहीतरी आहे. तुमच्यात जे म्हणते, "मला पुन्हा 18वर्षांचे व्हायचे आहे."

62 मला तुम्हाला काही विचारायचे आहे. काय जर तुम्ही पाचशे वर्ष अगोदर जन्माला आले असते, आणि तुम्ही अठरा वर्षाचेच आजच्या दिवशी राहीले असता? तर तुम्ही पुराण नसते काय? आपल्या पाचशे वर्षापूर्वीच्या कल्पनेद्वारे! येथे यात्रेकरु पूर्वज येण्याअगोदर, तुम्ही एक तरुणी त्या प्रकारच्या कल्पनेची होता का, तुम्ही संपन्न होते, पुढे गेलेले असता व म्हातारे झालेले असता आणि पाचशे वर्षापर्यंत जगले असता. पाहा, तेथे काहीतरी चुकत आहे.

63 तुम्ही म्हणता, "ठीक आहे, यावेळी मला फार बरे वाटत आहे, ब्रदर ब्रॅन्हम. ओह, मी—मी—मी अठरा वर्षाचा आहे. मी सोळा वर्षाचा आहे, मला बरे वाटते." प्रिये, मला तुला काहीतरी सांगू दे. तुम्हाला कसे समजले की, तुमची आई या क्षणाला जगत आहे. जर ती मंडळीत नाही ये? तुम्हाला कसे समजेल की तुमचा प्रियकर किंवा प्रेयसी काही मिनिटांअगोदर मारले गेले, नाही? तुम्हाला कसे समजेल या सकाळी तुम्ही तुमच्या घरात प्रेत नसाल? तुम्हाला कसे समजेल तुम्ही ह्या रात्री मंडळीबाहेर, जीवंत जाल? येथे अशी अनिश्चिती आहे. तेथे काही निश्चित नाही. जर तुम्ही पंधरा, बारा, एकोणीस, पंचाहत्तर किंवा नव्वद वर्षाचे असाल! तेथे...सर्व गोष्टी अनिश्चित आहेत. तुम्हाला माहीत नाही की, तुम्ही कोठे उभे आहात. परंतु तरीही तुम्ही इच्छा करता की, पुन्हा पंधरा, अठरा वर्षाचे व्हावे. कशामुळे तुम्ही तसे करता?

64 आता, जर तुम्ही मागे अठरा वर्षापर्यंत गेलात आणि तेथेच राहीलात, आणि कधीच आजारी झाला नाहीत. आणि कधीच...तुमच्या बरोबर इतर लोकं असावी लागणार, कारण तुमची अधिक वेगाने वाढ होते, पाहा. लोक दुसऱ्या युगात जातील आणि तुम्ही पुराण व्हाल. तुमची स्थिती अधिक वाईट होईल. जर तुम्ही वयाने त्याच्याबरोबर वाढत गेला, परंतु तेथे काहीतरी आहे, जे तुम्हाला तेथे असण्यासाठी बोलावीत आहे. ते लहान अगापे, ती लहान छाया जी तुम्हाला बनवते...येथल्या पेक्षा थोडी वर आहे.

65 आता मी विश्वास करतो की, रात्री किंवा दुसऱ्या सकाळी सात वाजता जेव्हा, पवित्र आत्मा, त्यांच्या चांगुलपणाने आणि त्यांच्या कृपेने, मला ह्या शरीरातून घेऊन गेला, मी विश्वास करतो, मी विश्वास करतो. होय किंवा नाही, मी बोलत नाही, आणि त्या जागेत मी प्रवेश केला. त्या लोकांना पाहीले, आणि ते सर्व तरुण होते आणि मी माझ्या जीवनातील

सर्वात सुंदर लोकं तेथे पाहीले आणि तो म्हणाला. “ह्यांच्यातील काही नव्वद वर्षं वयाचे आहेत. ते तुझ्याद्वारे परिवर्तन झालेले लोक आहे. आश्चर्य नाही, ते ओरडत आहे! माझा भाऊ! माझा भाऊ!”

66 आता, ते दिव्य शरीर आहे, जेव्हा आपण मरतो आपण एक कल्पित कथा बनत नाही, आपण एक शरीर बनतो. जर आपण, प्रत्येक जण, मरतो जर ह्या आतापासून मिनिटाला एक अणूबॉम्बने आपल्याला उडविले, पाच मिनिटात आपण एकमेकांशी हस्तांदोलन करु लागू आणि एक दुसऱ्याला आलिंगन देऊ, आणि ओरडून आणि अशाप्रकारे परमेश्वराचे गौरव करु! होय, महाशय. आणि भाऊ आणि बहिण स्पेंसर येथे बसलेले आहेत. मला वाटते सर्वात वयस्कर ते येथे आहे, तेथे अठरा, वीस वर्षे वयाचे असतील. भाऊ नेव्हिल, एक तरुण मुलगा असेल, आणि मी एक तरुण लहान मुलगा असेन आणि आपण सर्व असेच...हे अगदी सत्य आहे. “जर हे पृथ्वीवरील मंडपरुपी गृह मोडून टाकण्यात आले, आपल्याकरिता अगोदरच दुसरे वाट पाहत आहे.”

67 जेव्हा एक लहान बालक त्याच्या आईच्या उदरात टाकले जाते, एक नैसर्गिक जन्म, त्याचे लहानसे शरीर हालते आणि पाय उडवते, आणि अशा प्रकारे. तुम्ही तरुण स्त्रियांनो, मला ह्या हावभावाबद्दल क्षमा करा. परंतु, जेव्हा असे होते, जीवनाचे स्नायू जे धक्का देत असतात. परंतु जेव्हा ते पृथ्वीवर येते, प्रथम गोष्ट ते श्वास घेते, आणि तेथे निसर्गात आत्मिक शरीर आसते, जे त्या बाळात तेव्हा येते. त्याला एकटेच असू द्या, ते त्याचे लहानसे डोके वर काढून आईच्या स्तनाकडे जाते आणि दूध पिण्याची सुरुवात करते. जर ते तसे करीत नाही, दूध त्यातून मुळीच येणार नाही.

68 तुम्ही कधी वासराला जन्माला आल्यावर पाहीले आहे का...त्याला त्याच्या पायावर उभे राहण्याची पुरेशी शक्ती मिळते? त्याला हे कोण सांगते? त्याच्या आई सभोवती जातो, पायाजवळजातो आणि दूध पिण्यास सुरुवात करतो. ओह, होय!

69 म्हणून, जेव्हा हे पृथ्वीवरील शरीर येथे आणले जाईल, तेथे एक आत्मिक शरीर सिध्द केलेले आहे आणि जसे हे आहे. हालेलुयाह! “आणि जर हे...आहे. आमचे पृथ्वीवरील मंडपरुपी गृह मोडून टाकण्यात आले, तेथे पलिकडे एक वाट पाहत आहे.” जेव्हा आम्ही ह्या एकातून बाहेर निघू, तेव्हाच आपण दुसऱ्याच्या आत जाऊ. ते असे आहे; ज्यास पाण्याचे थंड पेय नको, जे त्यांना पाण्याचीही गरज नाही; जे खात नाही, ते पृथ्वीच्या मातीतून आले नाही. परंतु ते इतके खरे आहेत, आणि अनुभव करु शकतात आणि हस्तांदोलन करु शकतात, आणि ते फक्त प्रेम करतात आणि सर्व गोष्टीत परिपूर्ण आहे. आणि ते शरीर पलिकडे वाट पाहत आहे. ते त्याचा भाग आहे. तेथे त्याच्यातले तीन आहेत.

70 तुम्ही तुमच्या सार्वकालिक जीवनाची सुरुवात येथेच ह्या वेदीवर करता. येथूनच तुम्ही सार्वकालिक जीवनाची सुरुवात करता. ओह! तुम्ही सार्वकालिक जीवनाची सुरुवात येथूनच करतात. तेव्हा तुम्ही नविन जन्म पावलेले, परमेश्वराचे पुत्र होत आणि जेव्हा—जेव्हा तुम्ही मृत्यु पावता, तुम्ही सुरुवात...जेव्हा तुमचा मृत्यु तुम्हावर ह्या शरीरात आघात करतो आणि हृदय धडधडणे थांबते आणि मर्त्य चाके स्थिर उभे राहण्यास सुरुवात होते. ती लहान छाया, जी छायेची छाया होती. एका सेकंदात जी छायेची छाया होते. तेव्हा नंतर ती छाया बनते. नंतर ती एक लहान झरा बनते, नंतर ती एक खाडी बनते, तेव्हा नंतर ती एक नदी बनते आणि नंतर तो समुद्र बनतो, आणि काहीच वेळानंतर तुम्ही तुमच्या प्रियजनाच्या समोर पलिकडे उभे असता. स्वर्गीय शरीराचे वस्त्र घातलेले की, तुम्ही एकमेकांना ओळखता, एकमेकांवर प्रेम करता. तुम्ही पुन्हा एका तरुण पुरुष आणि स्त्रीमध्ये

बदलले जाता. अगदी बरोबर आहे. ते शरीर प्रभू येशूच्या येण्यापर्यंत तेथे वाट पाहते आणि कोणी एके दिवशी ते गौरवी शरीर...आता लक्ष द्या. ते स्वर्गीय शरीर आहे. गौरवी नाही. एक स्वर्गीय शरीर आणि एके दिवशी ते स्वर्गीय शरीर येशू बरोबर सुखलोक सोडील.

71 "मी तुला हे सांगतो," दुसरे थेस्सलनीकाकरांस पत्र, 5वा अध्याय, किंवा पहिले थेस्सलनीकाकरांस, 5वा अध्याय एक किंवा दुसरे, "मी तुम्हास सांगतो, बंधुजनहो, झोपी गेलेल्या लोकांविषयी तुम्ही अजाण नसावे अशी आमची ईच्छा आहे. ह्यासाठी की, ज्यांना आशाच नाही अशा बाकीच्या लोकांसारखा तुम्ही खेद करु नये. कारण येशू मरण पावला व पुन्हा उठला. असा जर आपला विश्वास आहे. तर त्याप्रमाणे येशूच्याद्वारे जे झोपी गेले आहेत, त्यांना देव त्याच्याबरोबर आणील. प्रभूच्या वचनावरुन आम्ही हे तुम्हाला सांगतो की, प्रभूचे येणे होईपर्यंत जे आपण जीवंत असे उरु ते आपण आघाडीस" (सर्वोत्तम वचन) "झोपी गेलेल्यांच्या आघाडीस जाणारच नाही. कारण आज्ञाध्वनी, आद्यदिव्यदूताची वाणी व देवाच्या तुतारीचा नाद होत असता, प्रभू स्वतः स्वर्गातून उतरेल आणि ख्रिस्तामध्ये जे मेलेले आहेत, ते पहिल्याने उठतील." ही स्वर्गीय शरीरे खाली येतील आणि पृथ्वीवरील, गौरवी शरीरे परिधान करतील. "आणि आपण जे जीवंत उरु, आणि क्षणात डोळयाचे पाते लवते न लवते तोच बदलले जाऊ आणि प्रभूला अंतराळात भेटण्यासाठी सामोरे जाऊ."

72 "आतापासून मी आपल्या बापाच्या राज्यात तुमच्या बरोबर नवा द्राक्षारस पिईन. त्या दिवसापर्यंत द्राक्षवेलाचा हा उपज मी पिणारच नाही." विवाहाचे भोजन. साडे तीन वर्षाच्या काळात ख्रिस्तविरोधी त्याचे राज्य संपविल. संपूर्ण जगाचा नाश होईल, यहूदी बाहेर बोलावले जातात. योसेफ परराष्ट्रीयांना, किंवा यहूद्यांना त्याची ओळख देतो. आठवण ठेवा, जेव्हा योसेफ त्याची ओळख बंधुजनांना देतो, तेथे एकही परराष्ट्रीय उपस्थित नसतो. जेव्हा तो पाठवतो...तुम्हाला ही गोष्ट माहीत आहे. योसेफ, सर्व बाबतीत, ख्रिस्ताचा परिपूर्ण दर्शक आहे आणि जेव्हा योसेफ त्याच्या बंधुजनांना बोलावणे पाठवतो, आणि ते येतात, आणि तो पाहतो आणि छोटा बन्यामीन त्याला दिसतो, आणि मग तो...ते म्हणतात, "का? हा व्यक्ति! आपण—आपण आपला भाऊ योसेफाला, मारायला नको होते." यहूद्यांना कळते की त्यांनी चूक केली आहे; आता जेव्हा ख्रिस्त स्वतःस त्यांना प्रकट करतो आणि योसेफाला इतके गहीवरुन आले की, त्याला जवळजवळ रडू आले, म्हणून त्याने त्याची पत्नी आणि त्याच्या लेकरांना, सर्व रक्षक आणि इतर सर्वांना बाहेर काढले, आणि त्यांना महालात पाठवले. अगदी बरोबर आहे. आणि तेव्हा फक्त यहुद्यांच्या उपस्थितीत, तो म्हणाला, "मी योसेफ तुमचा भाऊ आहे. मी तुमचा भाऊ आहे." आणि तेव्हा ते पडले आणि भीतीने थरथरु लागले, म्हणाले, "आता आम्हाला माहीत आहे, आम्हाला ते मिळेल. कारण आम्ही आमच्या भावाला मारले. आम्ही सांगितले आहे की, आम्ही आपल्या भावाला मारले, आणि आता तो हा महान राजा झाला आहे."

73 तो म्हणाला, "देवाने हे एका उद्देशाने तुमचे प्राण वाचवावे, म्हणून केले." तेच एक कारण आहे, देवाने आम्हा परराष्ट्रीयांना वाचविण्यासाठी हे केले. परंतु परराष्ट्रीय महालात होते. हालेलुयाह! त्याच्या स्वकीयांनी, नाकारल्यानंतर योसेफ, त्याने एक वधू घेतली; आणि ती वधू एक परराष्ट्रीय होती, यहूदी नव्हती. ठीक आहे.

74 आता, तुम्ही कोठे जात आहात? नंतर आपण हे गौरवी शरीर परिधान करतो, आणि तो महान समय येणार आहे; जेव्हा हे गौरवी शरीर हे स्वर्गीय शरीर गौरवी शरीर केलेले आहे. तुम्हाला मला काय सांगायचे ते समजते काय? तेव्हा मी तेथे चालून जाऊ शकतो आणि म्हणू शकतो, "भाऊ नेव्हील!" मला तुम्हाला एक लहानसे उदाहरण देऊ द्या. मी म्हणालो, "भाऊ ह्यूम्स, आपण ह्या सकाळी पप्पाकडे जाऊया." तो परमेश्वर आहे. आता आपण त्याला ओळखतो, तो एक तारणारा आहे, तो आरोग्यदाता आहे.

75 पापाची निर्मिती अशी गोष्ट तेथे कधीच नव्हती. चांगले ते खाली गेले नाही. नाही का? पाप ही एक निर्मिती नाही. नाही, महाशय! पाप ही एक विकृती आहे. तेथे फक्त एकच निर्माणकर्ता आहे, तो परमेश्वर आहे. पाप हे बिघडविलेले नितीमत्त्व आहे. व्यभिचार काय आहे? विकृत केलेले नितीमत्व आहे. खोटे काय आहे? विपर्यास केलेले सत्य आहे. निश्चितच शाप वचन काय आहे? ते देवाचा आशीर्वाद बदलून शाप वचन देवाला देणे आहे, आशीर्वादाऐवजी पाप ही निर्मिती नाही. पाप ही विकृती आहे. म्हणून, सैतान पापाची निर्मिती करु शकला नाही, त्याने जे फक्त परमेश्वराने निर्माण केले होते, ते विकृत केले. ते अगदी बरोबर आहे. मृत्यु हे फक्त विकृत केलेले जीवन आहे.

76 आता ह्याकडे लक्ष द्या; तेव्हा मी वर जाईन, आणि मी म्हणेन, "भाऊ ह्यूम्स, तू आणि मी, आपण आणि भाऊ बीलर आणि काही बंधुजन आपण पप्पाकडे, परमेश्वराकडे जाऊया आणि सहज, आपण एक छोटासा प्रवास करुया. तुम्हा मुलांना डोंगर आवडतात. जेव्हा तुम्ही…"

"होय, आम्हाला निश्चित आवडत होते."

77 "ओह, तेथे पुष्कळजण लाखो मैल दूर पलिकडे नविन जगात आहे. तेथे पुढे बाहेर जा, फिरत राहतात."

78 "मला करावे लागेल…?…सूर्य प्रत्येक दिवशी, वर उंच येतो. मी तुमचे ऐकेन. जेव्हा ते बोलत आहेत. मी ऐकेन." यशया 66. ते बरोबर आहे.

79 आणि तुम्हाला माहीत आहे, मी तेथून बाहेर चालत आहे, आपण सर्वजण तेथून चालत आहे. सुमारे 500 वर्ष, फक्त एक लहानसा प्रवास आहे, दशलक्ष, त्याने काही फरक पडत नाही, पाहा. आणि आता—आता हे मूर्खपणासारखे वाटत आहे, परंतु ते सत्य आहे. पाहा, हे सत्य आहे. कारण तेथे समय नाही. तो अनंतकाळआहे आणि जेव्हा मी तेथे जातो. मी त्यांतून चालत तेथे जातो, आणि तुम्हाला तेथे ठाऊक आहे मी—मी—मी तेथे कोणाला भेटतो? मी म्हणालो, "ठिक आहे. जर तेथे बहिण जॉर्जी ब्रुस नसली तर! का, बहिण जॉर्जी, तुला पाहून मला खुप समय झाला." तशीच दिसत होती, जशी ती नेहमी असे. पाहा? ती दहा दसलक्ष वर्ष वयाची असेल, परंतु अगदी तरुण जशी ती होती. ती कोणाच्या तरी पाठीवर खोडत होती, आणि मी तेथे पाहीले, तो चीता होता, सिंह.

मी म्हणालो, "ह्या सकाळी, चीता, तू कसा आहेस?"

80 "म्याव," मांजरीच्या पिल्लासारखे, "ओह, मी तेथे काही बहिणींशी बोलत होतो. त्याच्या सभोवती तेथे खाली मोठी फुले होती. सभोवती पाहा, आम्ही तेथे 500 वर्षांपासून, आहोत. समजले आजूबाजूला पाहात." ते वेड्यासारखे भासते, परंतु ते सत्य आहे. ते अगदी बरोबर आहे. तशाच प्रकारे परमेश्वराने योजना केली.

81 अच्छा, बहिण जार्जी, तुझे हृदय आशीर्वादीत होवो. काही इजा होऊ शकत नाही, मुळीच नाही. संध्याकाळच्या समयी आपण डोंगराच्या वर जाऊ आणि म्हणू, "हे पप्पा, परमेश्वरा, मी एकदा हरवलो होतो. ओह, मी एकदा पापाच्या घाणीत होतो, पप्पा, परमेश्वरा, आणि तू मला वाचवले."

82 का लोक जे असे व्यक्त करतात ते वेडे होतात. ठीक, तो मनुष्य ज्याने '*ओ लव ऑफ गॉड,*' ह्या. पुस्तकाचे शेवटचे काव्य लिहीले. ते एका वेड्याच्या संस्थेच्या भिंतीवर शब्दांकीत केले होते, ज्याने देवाचे प्रेम व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. पाप्यांना तारण्यासाठी कसा त्याने स्वतःचा अधःपात घडवून आणला, आणि त्याने ते कसे केले,

त्याचे प्रेम जे तुम्हाला आणि मला वाचविण्यासाठी खाली आले. उपासने विषयी बोलला. देवदूतांना त्याविषयी काहीच माहीत नाही. उपासनेविषयी देवदूतांना फक्त माहीत आहे. तो तेथे उभा राहतो आणि त्याचे पंख मागे आणि पुढे आणि पलिकडे हलवतो. “हालेलुयाह! हालेलुयाह!” परंतु, ओह! दया ही समज येते, मी हरवलो होतो आणि आता मी सापडलो आहे. मी मेलो होतो मी पुन्हा जीवंत आहे! हे देवा, मी पाप केले होते. मी घाण होतो आणि मी खाली कचऱ्याच्या ढीगांत होतो.

83 येथे सर्वोत्तम आहे, जे तुम्हाला जीवन देऊ शकते. तुम्ही कधी येथे कोलगेटच्या कचऱ्याच्या ढिगाकडे गेलात? ती सर्वात मी आजपर्यंत पाहिलेल्या जागांमधील किळसवाणी जागा आहे. तो जुना धुराचा वास मला आजारी करतो. तेथे त्या सर्व जुन्या धूरात पडून राहणे, ते तुमच्या पोटाला आजारी करते. आतून बाहेर वळत राहतो. जसे एरंडेल तेल पिल्यानंतर होते. पाहा, अगदी तुम्हाला आजारी करते! आणि उंदीर तुमच्यावरुन पळतात, तुम्हाला चावण्याचा प्रयत्न करतात. आणि ते उत्तम जीवन आहे.आणि तेव्हा कोणीतरी खाली आले आणि तुम्हाला वर उचलले आणि तुम्ही खरेच वृध्दझाले आहात आणि स्वतःला सावरु शकत नाही. आणि तुम्हा वर उचलले. आणि तुम्हाला एक अठरा वर्षे वयाच्या मुलात बदलले. तुम्हाला एका डोंगराच्या माथ्यावर ठेवले, भरपूर आरोग्याने टवटवीत केले, चांगल्या, ताज्या हवेचा श्वास, चांगले थांड पिण्याचे पाणी. तुम्हाला पुन्हा त्या कचऱ्याच्या ढिगाकडे जायला आवडेल काय? कधीच नाही, कधीच नाही, कधीच पुन्हा त्या कचऱ्याच्या ढिगात जाण्यास आवडणार नाही.

84 आता, मित्रा, हाच त्याचा अर्थ आहे. तोच तो दृष्टांत, किंवा रुपांतर, जे काही, एक दृष्टांत आहे. मी दृष्टांत म्हणेन, कारण मला भीती वाटते की रुपांतर म्हटल्यास कोणीतरी दुखावला जाईल, तेच ते आहे. आता, जेव्हा परमेश्वराने...परमेश्वराने पुत्र आणि कन्या त्याच्याकडे आणण्यासाठी काय केले. आता, ते कोण लोक आहेत? त्यांनी कसे कधी... ह्यासाठी पात्र ठरण्यासाठी ह्या लोकांनी काय केले? त्यांनी ते कधी कसे केले? परमेश्वर, प्रारंभी, देवदूतांना बनविण्याअगोदर...किती जणांना माहित आहे की, तो अनंत आहे? जर तो नाही, तो परमेश्वर नाही. म्हणून, परमेश्वराने, त्याच्या अमर्याद दयेने, त्याने पाहीले की, लुसिफर ते करणार, जर त्याने ते निर्माण केले. त्याने त्यांच्यात स्वेईच्छा घातली होती आणि तुम्ही अजूनही तेथेच आहात. ते बरोबर आहे. बरे वाईट जाणणारे झाड आपल्या प्रत्येकासमोर ठेवले. तुम्ही तुमची निवड केली. आणि लुसिफर हा पहिला होता. ज्याने चुकीचा मार्ग निवडला आणि त्याने त्याच्या मागे आकर्षित करण्यास सुरुवात केली, स्वार्थी सर्व त्याच्याकडे घेण्याचा प्रयत्न करु लागला, इतरांवर स्वार होण्याचा प्रयत्न केला आणि तेथेच ह्याची सुरुवात झाली. आता, हे लक्षपूर्वक ऐका. तेथेच पापाची सुरुवात झाली. परमेश्वराने, त्याच्या अमर्याद बुध्दीने, ते पाहीले, आणि फक्त एक मार्ग पाहिला...

85 आता, तुम्ही त्रैक्य मानणारे बंधुजन, मी तुम्हाला दुखवू इच्छित नाही. परंतु परमेश्वराच्या चांगल्या वचनाच्या नावाने तुम्ही कशा प्रकारे येशूला परमेश्वरापासून वेगळा व्यक्ति म्हणून समजता? जर येशू दुसऱ्या व्यक्तिला घेऊ शकतो आणि त्याला जाण्यासाठी आणि मरण्यासाठी तयार करतो, ह्या येथे असणाऱ्या व्यक्तिला सोडविण्यासाठी, तर तो एक अन्यायी व्यक्ति होईल. तेथे फक्त एकच मार्ग आहे. ज्याद्वारे पमेश्वर ते करु शकला असता, त्याने स्वतः ती जागा घेणे! आणि परमेश्वर देहधारी बनला. ह्यासाठी की त्याने मृत्युची वेदना चाखावी, ती नांगी आणि मृत्यु आपल्यापासून दूर करावा, आपण त्याच्या स्वतःद्वारे दूर सोडविले जावे. म्हणूनच त्याची इतकी भक्ति केली जाईल. येशू एक मनुष्य होता, निश्चितच तो होता. तो एक मनुष्य होता, मनुष्य कुमारी मरियेपासून जन्मलेला. परंतु जो आत्मा त्याच्यामध्ये होता. तो परमेश्वराचा होता. अमाप होता. तो, त्याच्यामध्ये देवाची

पूर्णता वसते. तो यहोवा—यिरे होता, तो यहोवा—राफा होता. तो यहोवा—मनस्से, तो यहोवा; आमची ढाल, आमच्या संरक्षणाचे साधन, आमचा आरोग्यदाता होता; तो अल्फा, ओमेगा, आदी आणि अंत होता; तो पहिला, शेवटचा होता; तो होता, आहे, आणि येणार. मूळआणि दाविदाचा अंकूर, पहाटेचा तारा, का, तो सर्वस्व होता? त्याच्यामध्ये देवाची पूर्णता मुर्तीमान वसते!

86 आणि मृत्येकडे सदैव एक नांगी होती, त्याने तो लोकांना दंश करीत असे, “ओह,” सैतान म्हणाला, “तू मला सापडला, कारण तू माझे ऐकले. तुला नांगी मारतो, मी तुला कबरेत टाकेन. त्या मेंढराचे रक्त तुझे अजून साहाय्य करु शकत नाही, ते फक्त पशूचे रक्त आहे.” परंतु परमेश्वर, त्याच्या ज्ञानाने, जाणून होता की, तेथे एक कोकरा येणार आहे, युगाच्या स्थापनेपासून जो वधला जाणार आहे. होय, महाशय. आणि ते...त्याने त्या समयापर्यंत वाट पाहिली, काळाची पूर्णता होण्याकरिता.

87 परंतु एके दिवशी जेव्हा हा कोकरा आला, हा मनुष्य, सैतानदेखिल फसवला गेला. त्याने त्याच्या सभोवती पाहीले, तो म्हणाला, “जर तू देवाचा पुत्र असशील, तर हे कर. जर तू देवाचा पुत्र असशील, हा चमत्कार कर आणि मला तू ते करताना पाहू दे. होय, मी त्याच्या तोंडावर चिंधी बांधीन, प्रहार करीन. जर तू संदेष्टा आहेस, आम्हास सांग तुला कोणी मारले.” हम! “मी नाही, मी विश्वास ठेवीत नाही की, तू तो मनुष्य आहे. जर तू असशील, आम्हास सांग तू कसा आहेस.” पाहा, सर्व अशाप्रकारे. “ओह, आम्हास सांग तू आहेस!” त्याने आपले तोंड उघडले नाही. ओह, ओह. त्याने तेव्हा त्याच्या डोळयावर लोकर ओढली होती का!

88 त्याने सभोवती शिष्याकडे, पाहिले आणि म्हणाला, “मी माझ्या पित्याला सांगू शकतो आणि तो माझ्यासाठी देवदूतांची मोठी सेना पाठवील. जर माझी इच्छा असली” तुम्हाला ठाऊक आहे? पिलाताने ते ऐकले नाही.

89 “जर तू असलास! जर तू असलास. ओह, तो—तो नव्हता. का, त्याला रक्तबंबाळझालेले पाहा. अरे, तुमच्यातील कोणी शिपायाने तेथे जा आणि त्याच्या तोंडावर तेथे थुंका.” थुंका, त्याला चिडवा, हाताने त्याची तोंडावरची दाढी खेचा. “ओह, तो असू शकत नाही! नाही, तो हा असू शकत नाही! मी माझी नांगी त्याच्यावर घातली, मी त्याला तेथे बरोबर घेईन. मला तू आता सापडला आहेस!”

90 जेव्हा तो शेवटचा ओरडला, “एली! एली! माझ्या देवा! माझ्या देवा!” तो एक मनुष्य होता. “मला तू का सोडलेस?”

91 गेथसेम बागेत, आत्म्याने त्याला सोडले, तुम्हाला ठाऊक आहे. त्याला एका पाप्यासारखे मरावे लागणार होते. तो एक पाप्याप्रमाणे मरण पावला, तुम्हाला ते ठाऊक आहे; त्याच्या पापांमुळे नाही, परंतु माझ्या आणि तुमच्या पापांसाठी. तेथेच त्याचे प्रेम आत आले, कशा प्रकारे त्याने माझी पापे घेतली! ओह, हालेलुयाह, कशी त्याने माझी पापे घेतली!

92 आणि तेथे तो होता, तो त्याचे मुख उघडू शकला नाही. दंश करणारा म्हणाला, “तुला ठाऊक आहे, मला वाटते की, तो एक साधारण मनुष्य होता. तो कुमारीपासून जन्मला नव्हता, कारण मी माझी नांगी त्याच्यात घातली.”

93 आणि येथे तो आला, त्याची नांगी त्याच्यामध्ये घातली, परंतु ती चुकीची वेळ होती, मुला! त्याने त्याची नांगी तेव्हा बाहेर ओढून काढली. तो तेव्हापासून पुन्हा दंश करु शकत नाही, त्याने त्याची नांगी तेथेच सोडली. तिसऱ्या दिवशी उठला, आणि म्हणाला, “मी तोच आहे, जो मेलो होतो, पुन्हा जीवंत झालो आणि सर्वकाळासाठी जीवंत आहे,

माझ्याकडे मरणाच्या आणि अधोलोकाच्या किल्ल्या आहेत.” होय, महाशय. तो कोण होता हे समजण्यास तो अपयशी ठरला. “आणि कारण मी जीवंत आहे, तुम्हीही जीवंत राहाल. तो अजून प्रकट झाला नव्हता…”

94 एक दिवस, तीन किंवा चार दिवस गेले, नंतर तो पित्याकडे वर घेतला गेला, पुन्हा परत आला, तेव्हा काहीजण म्हणाले, “ओह, तो आहे…तो भूत असला पाहीजे. तो व्यक्ति कोणत्यातरी भूतासारखा आहे. आणि आम्ही…तुम्ही त्याला बघितले. तुम्ही दृष्टांत पाहता.”

“नाही, तो खरा येशूच होता.”

95 थोमा म्हणाला, “मला त्याचे हात आणि सर्व गोष्टी पाहू द्या, मी तुम्हाला सांगेन, तो आहे की काय?”

96 तो म्हणाला, “येथे मी आहे.” म्हणाला, “तुमच्याकडे तेथे काही मासा आणि भाकरी आहेत का? माझ्यासाठी सँडवीच आणा.” त्यांनी त्याच्यासाठी एक सँडवीच आणले आणि तो तेथे उभा राहीला आणि ते खाल्ले. म्हणाला, “आता, जसे मी खाल्ले, तसा आत्मा खातो. काय? जसे मला हाडमांस आहे, तसे भूताला असेल का?” समजले? तो म्हणाला, “मीच तो आहे. मीच तो आहे.”

97 आणि पॉल म्हणाला, “हे प्रकट झाले नाही की, कशाप्रकारचे शरीर आपल्याला मिळेल, परंतु आपल्याला ठाऊक आहे, आपल्याला त्याच्यासारखे शरीर मिळेल.” काय? त्याच्याकडे कधी ते शरीर होते का? होय, महाशय! जेव्हा तो मृत्यु पावला. बायबल म्हणते की, “तो,” हे पुन्हा वैयक्तिक सर्वनाम आहे, “तो अधोलोकात गेला आणि तुरुंगात असलेल्या आत्म्यांना सुवार्ता सांगितली.” हालेलुयाह! त्याने ते कसे केले? त्याच्याकडे भावनेचे इंद्रीय ते त्यांच्याकडे ऐकण्याचे इंद्रीय ते त्याने त्याच प्रकारच्या शरीरात प्रचार केला. मी ती गौरवी शरीरे दुसऱ्या रात्री पाहिली. त्याने अधोलोकात असलेल्या आत्म्यांना प्रचार केला, ज्यांनी नोहाच्या महासंकटाच्या दिवसात पश्चाताप केला नव्हता.

98 परंतु जेव्हा तो रविवारच्या दिवशी उठला, हे शक्य नव्हते की, त्या शरीराने कुजण्याचा अनुभव घ्यावा, कारण दाविद संदेष्ट्याने हे पूर्वीच पाहिले होते, “मी त्याचा जीव अधोलोकात राहू देणार नाही.तो त्याच्या पवित्र जनांस कुजण्याचा अनुभव येऊ देणार नाही. शिवाय माझा देह आशेत स्वस्थ राहील. कारण तो माझा जीव अधोलोकात राहू देणार नाही आणि माझ्या पवित्राला कुजण्याचा अनुभव येऊ देणार नाही.” आणि बाहत्तर तासांअगोदर ते गौरवी शरीर, जे शरीर तेथे गेले आणि तुरुंगात असणाऱ्या जीवांस सुवार्ता सांगितली, ज्यांनी नोहाच्या प्रलयाच्या काळात पश्चाताप केला नव्हता, पुन्हा उठला, आणि जे मर्त्य त्यांनी अमरत्व परिधान केले, आणि तो उभा राहीला आणि त्याने खाल्ले, आणि त्याने आम्हाला सांगितले की, तो एक मनुष्य होता. हालेलुयाह!

99 भाऊ इवन्स, तशाच प्रकारे आपण त्याला पाहू. ते होईल जेव्हा तो दाविदाच्या राजासनावर बसेल. हालेलुयाह! तेव्हा आपण वर आणि खाली चालू, मी तुमच्याबरोबर एक सहल घेऊन डोंगरांच्या पलीकडे हजारो वर्षांच्या काळासाठी जाऊ, समजले, फक्त काही दिवस, फक्त काही मिनिटे, आपण तेथे पलीकडे जाऊ, तेथे सभोवती वर बसू.

100 तुम्हाला ठाऊक आहे, आणि ही खाण्याची वेळ आली आहे. पहिली गोष्ट तुम्हाला माहीत आहे, बहिण वुड्स म्हणाली…मी म्हणालो, “बहिण वुड, बरे तू ह्या सर्व काळात कोठे होती? मी तुला एवढ्या काळात पाहिले नाही…ते मला जणू काही पंधरा मिनिटे वाटले.”

“ओह, ते दोन हजार वर्षांपूर्वी, भाऊ ब्रॅन्हम.”

101 “ओह, तुला कसे वाटत आहे”? ओह, अर्थात तुम्हाला दुसरे काहीच वाटू शकत नाही. परंतु चांगले.

102 “म्हणाली, येथे या, मुलांनो, मी तुम्हाला काही दाखवतो. भावा, माझे प्रिय भाऊ. येथे पाण्याचा झरा आहे, तुम्ही आतापर्यंत प्यायलेल्यात सर्वोत्कृष्ट असा आहे. आणि, ओह! आपल्याला एक चांगले थंड पेय मिळेल. मी तेथे पोहचेन आणि एक मोठा द्राक्षाचा घड मिळेल आणि आपण सर्व तेथे खाली बसू आणि ते खाऊ.” ते आनंददायक होईल की, नाही? ते हेच आहे. ते हेच आहे.

103 आपल्याला हे कसे मिळाले? आपल्याला ते कसे मिळेल? परमेश्वराने, जगाच्या स्थापने अगोदरच, आपल्याला आगाऊच नेमून ठेवले! कोण? ते जे वचनदत्त देशात आहेत

> ...*त्याने* आपल्या *मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे आपल्याला येशू ख्रिस्ताच्या द्वारे स्वतःचे दत्तक होण्याकरिता प्रेमाने पूर्वीच नेमिले होते.*

> त्याच्या *कृपेच्या* गौरवाची *स्तुती व्हावी*...

आपण त्याची स्तुती त्याने सांगितल्याप्रमाणे करावी. म्हणूनच तो परमेश्वर होता आम्ही त्याची स्तुती करु इच्छितो.

> ...*ही कृपा त्याने आपल्यावर त्या प्रियकराच्या ठायी विपुलतेने केली आहे,* ख्रिस्तामध्ये आपला स्विकार केला आहे...

> *ज्याच्या ठायी* त्याच्या *रक्ताच्याद्वारे खंडणी भरुन मिळविलेली मुक्ति म्हणजे आपल्या* अपराधांची *क्षमा आपल्याला मिळाली आहे.*

104 मला पुन्हा मागे दत्तकपणाकडे जावे लागेल. परंतु मला येथे “पापांवर” एका मिनिटासाठी थांबू इच्छितो. “पापे,” तुम्ही ह्याकडे लक्ष दिले का? तुम्हाला माहीत परमेश्वर पाप्याला पापासाठी दोष लावीत नाही? तो त्याला पापी राहण्यामुळे दोष लावतो. जर एक पापी सिगारेट ओढतो, तो त्याला त्याकरिता दोष लावीत नाही. तो कसाही, एक पापीच आहे. समजले? समजले? त्याच्याकडे कुठलीही पापे नाही, पाप्यांकडे नसतात. तो फक्त एक पापी आहे, समजले त्याकडे कुठलेही पाप नाही. परंतु तुमच्याकडे पाप आहे, तुम्ही जे ख्रिस्ती आहात. तुम्ही लक्ष द्या. येथे तो त्याच्या मंडळीशी बोलत आहे. तिला सरळठेवण्यासाठी समजले? समजले? “पापांची क्षमा,” पाप. आपण पाप करतो. परंतु पापी फक्त एक पापी आहे. परमेश्वर त्याला क्षमा करीत नाही.

105 आता, तुम्ही म्हणता, “ठीक आहे. तो येथे गेला आणि एका मनुष्याला गोळी मारली. तुम्ही त्या विषयी काय करणार आहात?” तो माझा विषय नाही. मी काही सुधारक नाही, मी एक प्रचारक आहे. कायदा त्याची काळजी घेईल, ते सुधारक आहेत. ते...“ठीक आहे,” म्हणाल, “त्याने व्यभिचार केला.” ते कायद्याकडे आहे. ते तो आणि कायदा ह्यांच्यामध्ये आहे. मी—मी—मी—मी सुधारक नाही, मी लोकांना सुधारीत नाही. मी त्यांचे परिवर्तन करु इच्छितो. मी एक प्रचारक आहे. पाहा, माझे काम त्याला देवाकडे आणणे आहे. जर त्याने पाप केले, ते त्याचे काम आहे. तो एक पापी आहे. परमेश्वर त्याला उच्च पातळीने दोष देतो. सुरुवातीला तो एक पापी आहे, त्याला दोष देण्याची सुरुवात होते. प्रथम त्याला काही आधार नसतो. तो—तो कुठेच नसतो. तो प्रथम एक पापी असतो. त्याच्याकडे कुठली पापे नाहीत, तो एक पापी आहे.

106 तुम्ही बाहेर जाऊन असे सांगू शकत नाही, “*एवढी* रात्र आहे, आणि *एवढी* रात्र नाही.” नाही, ही सर्व रात्र आहे. तेच काय देवाने सांगितले. ते बरोबर आहे, तो फक्त एक पापी आहे, तेच सर्व आहे. “आता त्याने हे केले आहे, *ही* रात्र आहे, येथे *ही* खरेच तेजस्वी रात्र आहे.” मला ठाऊक आहे, परंतु ती सर्व फक्त रात्र आहे, तेच सर्व आहे. समजले?

107 मी असे सांगू शकत नाही, “*येथे* एवढाच प्रकाश आहे.” नाही, हा सर्व फक्त प्रकाश आहे, समजले, फक्त प्रकाश. तुम्ही किती आहे. हे सांगू शकत नाही. समजले? परंतु जर *तो* त्यामध्ये एक काळा डाग आहे, तर तेथे त्यामध्ये अंधार आहे.

108 म्हणून, “पाप” (एस—आय—एन—एस) आपल्याला (काय?) आपल्या पापांची क्षमा आहे त्याच्या रक्ताद्वारे, बहुमोल रक्त.

*...त्याच्या कृपेच्या समृध्दीप्रमाणे...*

109 आपण ते कसे विसरलो? कारण आपण योग्य आहोत, आपण आपल्या पापांच्या क्षमेसाठी काहीतरी केले? त्याच्या कशामुळे?

*...कृपेने;*

110 ओह, माझ्या प्रभू! माझ्या बाहूने मी काहीच आणले नाही, प्रभू. मी काहीच कर शकलो नाही, तेथे एकही गोष्ट नाही. जी मी करु शकलो. पाहा! त्याने अगाऊच मला नेमले, त्याने मला बोलावले, त्याने मला निवडले. मी त्याला कधीच निवडले नाही. त्याने मला निवडले, त्याने तुला निवडले. त्याने आपल्या सर्वांना निवडले. आपण त्याला निवडले नाही येशू म्हणाला, “तुम्ही मला निवडले नाही, मी तुम्हाला निवडले.” त्याने म्हटले, “प्रथम पित्याने आकर्षिल्याशिवाय कोणीही व्यक्ति माझ्याकडे येऊ शकत नाही, आणि पिता जे मला देतो ते सर्व माझ्याकडे येईल. आणि त्यांतील कोणालाही मी घालवून देणार नाही, केवळनाशाच्या पुत्राशिवाय, हा—शास्त्रलेख पूर्ण होण्यासाठी.” तुम्हाला समजले? म्हणाला, “परंतु जे सर्व पित्याने मला दिले आहे ते माझ्याकडे येईल.”

111 ओह, मी फार उशीर करीत आहे, मी नाही का? आणि मी ह्यांतून कधीच बाहेर येऊ शकत नाही. मी अजून विषयाला सुरुवात केली नाही. मला घाई करु द्या, मला येथे काहीतरी समजण्यासाठी आता, घाई करुया आणि आपण घाई करुया. मला काही मिनिटातच ह्या दत्तकपणाकडे यायचे आहे. ओह, तुम्ही जरा मला क्षमा कराल का? फक्त मिनिटासाठी? ह्याकडे येथे पाहू या, ही काही लोक येथे ह्या रात्रीसाठी जॉर्जीयाहून आली आहेत, त्यांचे हृदय आशीर्वादीत होवो. आता, भाऊ जॉर्जीयन, आणि टेक्सास आणि तुम्ही जेथून कुठून आला आहात, हे पाचवे वचन लक्षपूर्वक ऐका. आपण ह्या वचनाकडे थोड्या मिनिटासाठी पाहूया.

*आपल्याला पूर्वीच नेमले होते...*

112 “च्याकडे यू.एन.टी.ओ.” ह्या शब्दाचा अर्थ काय आहे, “च्याकडे यू.एन.टी.ओ,” शब्दाचा अर्थ? काही गोष्टींकडे आम्ही येत आहोत, च्याकडे “मी झऱ्याकडे जात आहे. मी खुर्चीकडे जात आहे.” ह्यूम्स, तुम्हाला ते समजते आहे का? “मी डेस्ककडे जात आहे.”

आता, त्याने आपल्या *मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे, आपल्याला प्रभू ख्रिस्ताच्याद्वारे स्वतःचे दत्तक होण्याकरिता प्रेमाने पूर्वीच नेमिले होते.*

113 किती सत्संकल्प? तो कोणाचा सत्संकल्प होता; कोणाचे चांगुलपण? त्याचे स्वतःचे. त्याच्या स्वतःच्या सत्संकल्पाप्रमाणे.

114 आता, “दत्तकपण” काय आहे? आता मला हे घेऊ द्या, मला ठाऊक नाही की,...हे घेण्यासाठी मला वेळ नाही, परंतु मी ते घेईन. जर तेथे काही प्रश्न असतील,

तुम्ही मला काही वेळानंतर कधीतरी विचारु शकता. लक्षपूर्वक ऐका. तुमचे दत्तकपण हा तुमचा जन्म नव्हे. तुमचे दत्तकपण हे तुमची पुर्नस्थापना आहे. जेव्हा तुमचा नव्याने जन्म झाला, योहान, 1:17 प्रमाणे, मी विश्वास करतो, जेव्हा आपला देवाच्या आत्म्याने जन्म होतो, आपण परमेश्वराचे पुत्र होतो. परंतु आपल्याला पूर्वीच नेमले होते. आता येथे मी तुम्हाला समजावण्याचा प्रयत्न करीत आहे की, ह्या अंतिम दिवसाच्या पुत्रासाठी, तुम्हाला समजले,...समजले? आपल्याला त्याच्यासाठी दत्तकपणासाठी पूर्वीच नेमिले होते.

115 आता आपण येथे आहोत. आता, हेच पेंटिकोस्टलना थोडेसे दुखविते; ते म्हणतात, "माझा नव्याने जन्म झाला! प्रभूची स्तुती होवो! मला पवित्र आत्मा मिळाला!" चांगले आहे. तुम्ही देवाचे लेकरु आहात. ते बरोबर आहे. परंतु अजून ते नाही, ज्याविषयी मी बोलत आहे. पाहा, तुम्हाला दत्तकपणासाठी पूर्वीच नेमले होते. दत्तकपण, हे पुत्राची पुर्नस्थापना करणे आहे.

116 मी त्याच्या खुप जवळ आहे. कारण बेकी मला म्हणाली की, मी त्याच्या खुप जवळ गेली आहे, तुम्ही मागे ऐकू शकत नाही. मी...

117 एका मुलाकडे, पाहा, किती जणांना जुन्या करारांतील दत्तकपणाचे नियम माहीत आहेत? अर्थात, तुम्ही पाहीले आहेत. एक पुत्र जन्मला होता. मला वाटते, मी—मी—मी—मी ते एका प्रवचनात घेतले होते. ते काय आहे. जेनी, तुम्हाला लक्षात आहे.? ते टेपवर आहे. ओह, ते काय होते? मी त्यावर येऊन थांबलो आहे. ओह, होय, मला ते मिळाले, *तुम्ही त्याचे ऐका; तुम्ही त्याचे ऐका*; लेकरांचे दत्तकपण.

118 आता, जुन्या करारात, जेव्हा एखादे लेकरु जेव्हा कुटुंबात जन्मत असे, जेव्हा त्याचा जन्म होत असे, तो मूल असे. कारण त्याच्या आईवडिलांपासून त्याचा जन्म होत असे, तो कुटुंबाचा मुलगा असे आणि सर्व गोष्टींचा वारस असे. आता, परंतु तो पुत्र शिक्षकाद्वारे वाढवला जात असे. गलतीकरांस, पत्र, 5वा अध्याय 17 ते 25. वचन. ठीक आहे. तो शिक्षकाद्वारे, दासीद्वारे वाढवला जात असे. आता, उदाहरणार्थ, जर मला एक पुत्र जन्मला, समजा, मी एक पिता आहे, आणि...

119 आणि हे कारण आहे किंग जेम्समध्ये, किती जणांनी आजपर्यंत ती मजेशीर गोष्ट किंग जेम्स आवृत्तीत वाचली आहे. जी म्हणते, "माझ्या पित्याच्या घरात खूप महाल आहेत"? एक घर, पुष्कळ महाल. समजले? खरेच त्या दिवसात जेव्हा किंग जेम्स करिता बायबलचे भाषांतर करण्यात आले, *घर* एक राजाच्या "हुकुमाखालील" सर्व प्रदेश होता. "माझ्या पित्याच्या *राज्यात* पुष्कळमहाल आहेत." घरात नाही, महाल. परंतु त्याला ह्या प्रदेशाचा पिता म्हणण्यात आले. ते त्यांच्याकडे ते अगदी बायबलप्रमाणे होते, बायबलमध्ये ते त्याचप्रकारे आहे.

120 जेव्हा एका पित्याकडे महान मोठे हजारो एकर शेत, किंवा काहीतरी इतर आहे. त्याच्याकडे *येथे* लोकांचा समुह राहतो. त्याने *तेथील* कित्येक लोक मेंढरांची काळजी घेण्यासाठी भाड्याने घेतले आहेत, त्याच्याकडे काहीजण गुराढोरांची काळजी घेण्यासाठी आहेत, त्याच्याकडे *येथे* काही जण आहेत, जे वरील श्रेणीमध्ये जेथे शेकडो मैल दूर, आणि *येथे* त्याच्याबरोबर काही जण बकर्यांची काळजी घेण्याकरिता होते, आणि त्याच्याकडे *काहीजण* खेचरांची काळजी घेण्याकरिता होते, आणि—आणि अनेक गोष्टी. त्याच्याकडे मोठे राज्य आहे. आणि त्याच्याकडे लहान गाढव आहे, आणि तो त्याच्यावर बसून सभोवती फिरला आणि पाहिले, ते कसे एकमेकांबरोबर राहत आहे, लोकर कातरत आहेत आणि सर्व गोष्टी अशाप्रकारे त्याला वेळ नाही.

121 तुम्हाला माझे ऐकू येत नाही जेव्हा मी तेथून दूर जातो. मी—मी—मी येथेच मागे राहण्याचा प्रयत्न करतो. आता, तुम्ही माझे व्यवस्थित ऐकू शकता का? पाहा.

122 तो स्वार झाला, आणि निघून गेला, त्याच्या—त्याच्या—त्याच्या राज्याची काळजी घेण्याचा प्रयत्न करीत होता. म्हणून आता त्याची इच्छा...तो पुत्र ज्याचे जे काही आहे. त्या सर्व गोष्टींचा वारस होणार आहे.

123 आणि जेव्हा आपल्या येशूख्रिस्ताद्वारे, देवाच्या राज्यात जन्म होतो, आपण स्वर्गाचे वारस, येशू बरोबरचे संयुक्त वारस होतो, कारण त्याने आपली जागा घेतली. तो आपल्यासाठी (पाप) झाला, ह्यासाठी आपण तो (नितीमत्व) व्हावे. समजले? तो मी झाला ह्यासाठी की, मी त्याच्यासारखे व्हावे, पाहा, त्याच्याबरोबर संयुक्त—वारस व्हावे. ठीक आहे, आता ते तुम्ही प्रत्येकजण, लक्षात ठेवा.

124 आता, लक्ष द्या, देवाने पूर्व ज्ञानाद्वारे तुम्हाला, पूर्वीच, नेमले की, तुम्ही येथे येणार. प्रत्येकाला हे समजले, तुमचे हात वर करा, समजले! देवाने, पूर्वज्ञानाद्वारे, तुम्हाला वचनदत्त भूमीत नेण्यासाठी पूर्वीच नेमले होते. आज ख्रिस्ती लोकांसाठी वचनदत्त भूमी काय आहे? जर तुम्हाला माहीत असेल, फक्त तुमचे हात वर करा. "हे वचन तुम्हाला तुमच्या मुलाबाळांना व जे दूर आहेत त्या सर्वांना दिले आहे. आणि ते शेवटच्या दिवसात ते पूर्ण होईल, परमेश्वर बोलला, मी माझ्या आत्म्याचा वर्षाव तुमचे पुत्र व तुमच्या कन्यांवर करीन." आणि यशया 28:18,"नियमांवर नियम, कानूवर कानू, थोडे येथे, थोडे तेथे. जे चांगले ते पकडून धर. तोतर्यांच्या द्वारे आणि परभाषेत मी ह्या लोकांशी बोलेन आणि हा विसावा आहे. (विसावा) विसाव्याची भूमी ज्याविषयी मी बोललो की, ते आत गेले पाहीजे आणि, हे सर्व, ते ऐकणार नाहीत, परंतु त्यांनी त्यांचे डोके हालविले आणि निघून गेले, आणि ते ऐकणार नाहीत." समजले? अगदी बरोबर आहे.

125 हे काय होते? हे अगदी ज्याप्रमाणे ते लोक कनानामधून, किंवा मिसरामधून, आले होते रानामधून आले, आणि त्यानंतर ते इतके जवळगेले की, त्यांनी त्या भूमीतून आलेली द्राक्षे चाखली. भावा, ते मला तेथे मागे त्याकडे नेऊ इच्छितात, इब्री 6वर. मी ते कसे करु शकतो? ते सीमेवरचे विश्वासी आहेत, ते त्यात कधीच जाणार नाही! ते त्यात जाऊ शकत नाही. येशूने म्हटले.

ते म्हणाले, "आमच्या पूर्वजांनी रानात मान्ना खाल्ला."

126 आणि येशू म्हणाला, "ते, प्रत्येक जण, मेले." ते, वेगळे केले गेले. ते प्रत्येक जण मेले. ते बरोबर आहे. म्हणाला, "परंतु मी देवापासून स्वर्गातून आलेली जीवनाची भाकर आहे. जो मनुष्य ही भाकर खातो, तो कधीच मरणार नाही. ते बरोबर आहे. होय, महाशय, जर तोही खातो. तर त्याला सार्वकालिक जीवन मिळेल, मी एदेन बागेतील जीवनाचे झाड आहे."

127 आता, पाहा, ते लोक इतके जवळ आले! समजले, जर तुम्ही इब्री 6मध्ये पाहिले, पुन्हा त्याकडे जात नाही, परंतु इब्री 6मध्ये "हे लोक एकदा वाटेकरी झाले, इतके जवळ आले, आणि स्वर्गीय दानाची रुची घेतली." ते सभोवती बसले, त्यांनी चंगाई मिळताना पाहिली, त्यांनी लोकांना देवच्या सामर्थ्यात पाहिले; त्यांनी जीवनाचे परिवर्तन झालेले पाहीले, परंतु त्यांनी त्यांचे हात त्यावर विश्वास ठेवला नाही. नाही, महाशय, नाही, महाशय. "आणि त्यांनी येणाऱ्या युगाच्या सामर्थ्याची रुची घेतली. आणि जे जर पतित झाले, तर त्यांना पश्चाताप होईल असे त्यांचे पुन्हा नवीकरण करणे अशक्य आहे. कारण ते—ते देवाच्या पुत्राला स्वतःपुरते नव्याने वधस्तंभावर खिळतात आणि कराराचे रक्त मोजतात ज्याद्वारे ते शुध्द झाले होते..."

128 "मी त्या मंडळीचा आहे जी पवित्रीकरणामध्ये विश्वास ठेवते." ते चांगले आहे. जोपर्यंत ते चालते, परंतु तुम्ही फार दुर जाऊ शकत नाही. समजले? होय, महाशय. रानात ते शुध्द झाले. होय, नक्कीच. त्यांच्याकडे पितळी साप आणि पितळी वेदी होती, आणि तेथे सर्व होते, पवित्रीकरण, परंतु ते पलिष्टी देशात विसाव्यासाठी गेले. नाही का...

129 इब्री 4मध्ये पाहा, त्याने असे म्हटले नाही का, "दुसरा विसावा"? देवाने सातवा दिवस निर्माण केला आणि सातव्या दिवशी त्यांना विसावा दिला. दुसऱ्या ठिकाणी तो विसाव्याच्या दिवसाविषयी बोलला, "आणि आज दाविदामध्ये." तेव्हा त्याने त्यांना दुसरा विसावा दिला. "अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या, म्हणजे मी तुम्हाला विसावा देईन." ह्या विसाव्यात प्रवेश करा! कारण आपण ज्या विसाव्यात प्रवेश केला, त्यांनी आपली कामे संपविले. जसे देवाने त्याच्या कामांपासून शब्बाथाच्या दिवशी केला. निश्चितच. तेथेच तुमचा शब्बाथ, विसावा आहे. तेथेच तुमचा खरा विसावा ह्या वचनदत्त भूमित आहे.

130 पवित्र आत्मा हे लोकांचे अभिवचन आहे. आणि त्यांना शिकवलेले विद्वान प्रचारक का पाहिजे जे त्यांना अर्धी विजार घालू देतात आणि त्याचे केस कापू देतात, आणि लाली लावू देतात, आणि परुषांना जुगार आणि बिअर पिणे आणि विनोद सांगणे, आणि हे चालू देतात, आणि अशा गोष्टी करु देतात, आणि त्यांना मंडळीचे सदस्य म्हणू देतात? का, ते अशा काही गोष्टी घेतील आणि पवित्र आत्म्याची अगुवाई नाकारतील! कारण, बायबल म्हणते देवाचे वचन कोणत्याही दुधारी तरवारीपेक्षा तीक्ष्ण असून जे सांधे व मज्जा ह्यांना भेदून आरपार जाणारे आणि मनातील विचारांचे परिक्षक आहे. होय, मनातील विचारांचेदेखिल परिक्षक आहे.

131 आणि जर आमच्यामध्ये जगाची प्रिती किंवा जगातील गोष्टींची प्रीती असेल, तर परमेश्वराचे प्रेम आमच्यात नाही. "बोलावलेले पुष्कळ आहेत, निवडलेले थोडे आहेत; जीवनाकडे जाण्याचा दरवाजा अरुंद आणि मार्ग संकोचित आहे. आणि ज्यांना तो सापडतो ते थोडके आहेत. त्यादिवशी पुष्कळजण माझ्याकडे येतील आणि राज्यामध्ये अब्रहाम, इसहाक आणि याकोबासह बसतील," असे येशूने म्हटले, "परंतु राज्याची लेकरे बाहेर ठेवली जातील, आणि म्हणतील 'प्रभू, आम्ही तुझ्या नावात हे केले नाही का? आम्ही प्रचार केला नाही का? आम्ही डॉक्टर *अमुक—अमुक* आणि आदरणीय *असे—आणि—असे* नव्हतो का? मला तुमची कधीच ओळख नव्हती. अहो अनाचार करणार्यांनो माझ्यापासून निघून जा. मी तुम्हाला ओळखत नाही. प्रभूजी, प्रभूजी म्हणणाऱ्या सर्वांचा प्रवेश होईल असे नाही. परंतु जो माझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेप्रमाणे वागतो त्याचा होईल."

132 तेथेच तुमचा, ह्या वचनदत्त देशात प्रवेश होतो. आपण त्यात कसे जाऊ? आपल्याला त्यासाठी आगाऊच नेमले आहे. मंडळीला, परमेश्वराच्या पूर्वज्ञानाने, आगाऊच नेमले आहे. (कशासाठी?) त्याच्या गौरवासाठी, त्याच्या कृपेद्वारे, गौरवासाठी आणि देवाच्या भक्ति आणि गौरवासाठी. पप्पा, प्रारंभी मागे तिथे बसला होता, स्वअस्तित्व असलेला, त्याच्यासभोवती कोणीच नव्हते, त्याला कोणीतरी उपासना करण्यासाठी हवे होते, म्हणून त्याने अगोदरच नेमले होते आणि स्थापनेअगोदर त्यांची नावे कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात ठेवली. जेव्हा त्यांनी...जगाच्या स्थापनेअगोदर वधले, ह्यासाठी की त्यांनी त्याच्या गौरवासाठी आणि त्याच्या स्तुतीसाठी काळाच्या शेवटी प्रकट व्हावे. जेव्हा सर्व गोष्टी एका मनुष्यात, येशू ख्रिस्तात, एक केल्या जातील. गौरव असो! ते तेच आहे...आणि तेथे ते बरोबर आहे, माझ्या भावा—बहिणींनो, तेथून तुम्ही कधीही ढळू नका.

133 परमेश्वराने तुम्हाला त्याच्या कृपेच्या निवडीद्वारे बोलावले आहे. परमेश्वराने त्याच्या कृपेच्या निवडीद्वारे तुम्हाला पवित्र केले आहे. त्याच्या कृपेच्या निवडीद्वारे आणि त्याच्या सामर्थ्याने तुम्हाला बाप्तिस्मा दिला आहे. आणि तुम्हाला विसाव्याच्या भूमित ठेवले आहे. त्यांनी विसाव्यात प्रवेश केला आहे. ते त्यांच्या अयोग्य मार्गापासून दूर गेले आहे. त्यांनी त्यांच्या कामापासून विसावा घेतला आहे. जसा देवाने त्याच्या कामापासून घेतला होता. त्यांच्याकडे अवर्णनीय आनंद आणि महिमेने परिपूर्ण आहे. जीवनाचे झाड त्यांच्यामध्ये बहरत आहे. त्यांच्याकडे सहनशीलता, सभ्यता, चांगुलपणा, विश्वासयुक्त, धीर, विश्वासूपणा, सौम्यता, सभ्यता आणि इत्यादी. जीवनाचे झाड त्यांच्यात बहरत आहे. कारण त्यांची आशा येशू ख्रिस्तामध्ये रोवलेली आहे. पवित्र आत्म्याची साक्ष त्यांच्यामध्ये विश्वासणाऱ्या बरोबर असणाऱ्या चिन्हे आणि अद्भूताद्वारे दर्शवित आहे. “विश्वासणाऱ्याबरोबर ही चिन्हे असत जातील.” ते जात असता, ते आजाऱ्याना बरे करतील. ते भूते काढतील. ते नव्या—नव्या भाषा बोलतील. ते दृष्टांत पाहतील. ते... आणि ते देवाबरोबर चालतात. ते देवाबरोबर बोलतात. कोणी सैतान त्यांना हलवू शकत नाही. ते निश्चल आहेत. वाट पाहत आहे...?...भूतकाळात झालेल्या गोष्टी विसरुन येशू ख्रिस्तामध्ये बोलाविलेल्या खूणेकडे जात आहेत. तेथे ते आहे. तेथे ते आहे. तीच त्याची मंडळी आहे.

134 ते तेथे कसे जातील? तुम्ही सांगू शकत नाही, “अच्छा, तुला माहीत आहे, एके दिवशी मी धुम्रपान करण्यास सुरुवात केली, आणि मी पडलो, तेव्हा मी विचार केला...” ओह, नाही, नाही, नाही, नाही.

135 पूर्वनियुक्ती! त्याने आपल्याला बोलावले आहे आणि तेव्हा आपण त्याच्यामागे गेलो. जेव्हा आपण बोलतो, “देवा, आम्ही हरवलो होतो आणि नाश पावलेलो होतो. आमच्याकडे स्वतःला वाचविण्याची ही बुध्दी नव्हती. आम्ही डुकराच्या स्वभावात होतो, आम्ही सुरुवातीला डुक्करच होतो.”

136 तुम्ही बाहेर डुकराच्या घराकडे जाता आणि वृध्द डुकरिणीकडे पाहता, आणि म्हणता, “आता, येथे पाहा, मला तुला काही सांगायचे आहे. तुझ्यासाठी घाण पिणे हे चुकीचे आहे.”

137 ती म्हणेल, “ओइंक—ओइंक.” समजले? आता फक्त ते तुम्हाला जितके होईल तितके स्वतःला वाचवणे आहे. ते अगदी बरोबर आहे.

138 तुम्ही म्हणता, “बाई, तू तसा पोषाख घालू नये, तू व्यवस्थित पोषाख परिधान केला पाहीजे. तू हे केले पाहीजे. तू तेथे जाता कामा नये...तू ती पत्त्याची मेजवानी करता कामा नये, तू धुम्रपान करता कामा नये, तू *ते* करता कामा नये, श्रीमान, तू *ते* करता कामा नये.”

139 तो म्हणतो, “ऑइंक—ऑइंक. मी, *ऑइंक—ऑइंक*” चा आहे. होय “ऑइंक” म्हणजे फक्त ज्याविषयी त्यांना माहीत आहे. “अच्छा, मी तुला कळवीन की, मी ही तुझ्या इतकाच चांगला आहे. ऑइंक—ऑइंक!” पाहा, ते पवित्र आत्म्याचा मार्गदर्शन नाकारतात. कारण बायबल म्हणते, की जर तुम्ही जगावर प्रीती करता किंवा जगातील गोष्टींवर प्रीती करता, तर तुमच्यामध्ये पित्याची प्रीती नाही.

140 त्यांना विषेश काय करते? तुम्ही एक पवित्र राष्ट्र आहात, तुम्ही काय केले आहे? त्या देशातून बाहेर प्रवेश केला तुम्ही दुसऱ्या देशाचे आहात. तुम्ही तेथे कसे गेला? तो वचनदत्त देश आहे. कशा प्रकारचे अभिवचन? “ते अंतिम दिवसात घडेल, देव म्हणाला, मी सर्व देहावर माझ्या आत्म्याचा वर्षाव करीन.” एका आत्म्याद्वारे आम्हा सर्वांचा बाप्तिस्मा त्या

एका वचनदत्त देशात झाला आहे. आमेन. भावांनो आणि बहिणींनो, हालेलुयाह, हृदयाच्या शुध्दतेने, हेवा नाही. शत्रुत्व नाही, काहीच नाही! जर माझा भाऊ चुकीच्या मार्गाने गेला, तर मला त्याची पर्वा नाही, तो काय करीत आहे. ह्याच्याशी मला कर्तव्य नाही, तुम्ही त्याच्यामागे जाल.

141 फार काळ झाला नाही. मी एका भावामागे गेलो, जो चुकीच्या मार्गाने गेला होता. एक तरुण व्यक्ती मला म्हणाला, "त्या हरामखोराला जाऊ दे. त्याला एकटेच राहू दे."

142 मी म्हणालो, "जर मी अशा ठिकाणी आहे की, जेथे माझे हृदय माझ्या भावाबरोबर जुळत नाही, तर हा माझ्यासाठी वेदीजवळ जाण्याचा समय आहे, कारण मी कृपेतून पडलो आहे." मी म्हणालो, "मी त्याच्या बरोबर जाईन जोपर्यंत त्याच्या देहात श्वास आहे, आणि मी त्याला कोठेतरी मार्गात पकडेन." होय, महाशय. आणि मी त्याला पकडले, हालेलुयाह! त्याला परत आणले. होय महाशय. तो आता सुरक्षित परत आला आहे. होय, महाशय, तो निश्चितच जगात चुकीच्या मार्गाने गेला असता.

143 काही क्षणाअगोदर जेव्हा मी तेथे एका गरीब लहान स्त्रीला बसलेले पाहीले, आणि शेरीफने मला बोलावले, म्हणाला, "का, तीने वेड्या माणसास घालतात असा अंगरखा घालायला हवा होता." म्हणालो, "ती आनंदाने बेहोश झाली आहे. तिचे भान गेले आहे." ती—ती त्यांनी तीला हॉटेलमध्ये ठेवले ते आले.

मी म्हणालो, "ते अगदी बरोबर आहे."

144 शेरीफ म्हणाला, "का, बीली!" मी तिला वास्तविकरित्या ओळखतो, आणि मी त्याला लहानपणापासून ओळखतो. त्याने म्हटले, "जर तेथे असे काही आहे मी मदत करु शकतो."

मी म्हणालो, "ते सर्व बरोबर आहे."

म्हणालो, "तू तिला मदत करु शकतो का?"

मी म्हणालो, "नाही, परंतु *तो* करु शकतो." मी म्हणालो, "फक्त एक मिनिट."

145 म्हणून त्यांनी तिला तेथे बाहेर आणले आणि जेव्हा ती शांतीने, काही वेळा अगोदर निघाली. ते काय होते? आम्ही तिच्यामागे एक प्रार्थना पाठवली. आमेन...ती इतकी होती...

146 ते म्हणाले, "तुम्हाला डॉक्टरकडे जायचे आहे का?" तिच्या पतीला विचारले, "तुम्हाला डॉक्टरकडे जायचे आहे का?"

147 म्हणाला, "डॉक्टर तिच्यासाठी काहीच करु शकत नाही." आणि ते बरोबर आहे. ती वेडी आहे. डॉक्टर तिच्यासाठी काहीच करु शकत नाही.

म्हणाला, "आपली एकच आशा *तेथे* जाणे आहे."

आणि तो म्हणाला, "बीली, मला ते कळत नाही."

मी म्हणालो, "मी तुझी येण्याची अपेक्षा करत नाही. तुझी अपेक्षा करत नाही"

148 परंतु, ओह, माझ्या प्रभू मलाही ते समजत नाही! नाही. परंतु, भावा, स्वर्गातील परमेश्वर...मी एकदा, पलीकडे दूर होतो, काहीतरी माझ्या मागे आले. आमेन! ते ह्यासाठी की मला यायचे होते, परंतु, नाही, काहीतरी माझ्या मागे आले. कारण जगाच्या स्थापने अगोदर, देवाने अगाऊच नेमले, हालेलुयाह, की आपण त्याचे असावे, त्याच्या सन्मान आणि गौरवासाठी. लक्षपर्वक ऐका! ज्यांना तो पूर्वीच ओळखत होता, त्याच्याकडे काय आहे? बोलावले. ते बरोबर आहे? त्याने तुम्हाला बोलावले का? होय! त्याने तुम्हाला का

बोलावले? तो तुम्हाला अगोदरच ओळखत होता. ज्यांच्याविषयी त्याला पूर्वज्ञान होते, त्याला त्याने बोलावले. ज्यांना त्याने बोलावले, त्याने नितीमान ठरवले. हे बरोबर आहे का? आणि ज्यांना त्याने नीतिमान ठरवले, त्याने त्यांचे गौरव केले! आमेन! बायबल तेच सांगते. ज्यांचे त्याला पूर्वज्ञान होते, त्यांना त्याने बोलावले. प्रत्येक पीढी! ज्यांना त्याने बोलावले, त्याने त्याचे गौरव केले. काय? येथे मला वचन वाचू द्या. ठीक आहे.

> *त्याने आपल्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे* आपल्याला *येशू ख्रिस्ताच्या द्वारे* स्वतःचे *दत्तक होण्याकरिता प्रेमाने पूर्वीचे नेमले होते.*
>
> त्याच्या कृपेच्या *गौरवाची स्तुती*...

149 ओह, तुम्हाला हे समजते का? त्याच्या गौरवाची स्तुती! तो तेथे अनंतकालात बसून ते करण्याकरिता बसू शकला, आणि त्याची लकरे ओरडतील. "अब्बा, बापा! अब्बा, बापा!"

150 आणि देवदूत म्हणतात, "ते कशाविषयी बोलत आहे? ते कशाविषयी बोलत आहे?"

151 इतके सुंदर रीतीने ह्याचे चित्रण उधळया पुत्राच्या दाखल्यात केले आहे. "मी हरवलो होतो." "हा माझा प्रिय पुत्र आहे. तो हरवला होता आणि आता तो सापडला आहे. तो मेला होता आणि पुन्हा जीवंत झाला आहे. पुष्ट वासरु आणा, उत्तम झगा, अंगठी आणा आणि त्याच्या बोटात घाला. आणि ह्यात आश्चर्य आपण..." नाही जेव्हा पहाटेचे तारे एकत्र गाऊ लागले. देवाचे पुत्र आनंदाने ओरडू लागले, जेव्हा त्याने तारणाची योजना पाहिली, देव तुमचे नाव त्या पुस्तकात जगाच्या स्थापनेअगोदर घालीत होता.

152 आता तुम्ही म्हणाला, "कॅल्विन अशाचप्रकारचा विश्वास करतो." मी कॅल्विनवर विश्वास ठेवीत नाही. कॅल्विन एक खुनी होता. कॅल्विनने एका मनुष्याला मारले, कारण त्याने येशूच्या नावात बाप्तिस्मा घेतला. तो एक बदमाश होता. त्याला स्वतःला परिवर्तनाची गरज होती. होय, महाशय. परंतु त्याने जेव्हा सांगितले, काही गोष्टींविषयी तो बोलला, ज्या बरोबर होत्या. करु नका...परंतु त्याने जे...त्याचे कृत्य, एक मनुष्य जो मनुष्याला अशा काही गोष्टीबद्दल मारुन टाकतो, ते भयंकर आहे, तो पापी आहे. ठीक आहे.

> *त्याने* आपल्यावर *विपुलतेने केली* आहे...

153 थांबा, मला ते "दत्तकपण," कळले नाही, मला कळले का? मी खुप उशीर करीत आहे का? आपण पाहूया की, घड्याळकाय सांगत आहे, आपल्याकडे किती वेळ आहे, ठीक आहे. आपण फक्त—फक्त दहा मिनिटे ह्या लोकांसाठी घेऊया, जे इतक्या लांबून आले आहे. पाहा—पाहा.

154 "दत्तकपण" तुम्हाला दाखवू द्या. आता ते का केले आहे. पित्याचे एक मोठे राज्य आहे, तो सभोवती फिरतो. आता एक पुत्र जन्मला आहे. ओह, तो खुप आनंदीत आहे! (तो परमेश्वर आहे) म्हणून तुम्हाला माहित आहे की, पित्याने काय केले? त्याने एक उत्कृष्ट वाढविणारा, शिक्षक शोधला. तुम्हाला ठाऊक आहे की, शिक्षक काय आहे, तुम्हाला माहीत नाही? तो एका शाळेचा शिक्षक आहे. त्याने संपूर्ण देशातला एक सर्वात चांगला शालेय शिक्षक शोधला. (आणि नंतर आपण आता जात आहोत. लक्षपूर्वक ऐका) आणि त्याने उत्तम शालेय शिक्षक शोधला. जो त्याला शोधता आला. त्याला फक्त एक गुलाम मिळाला नाही. त्याला त्याच्या मुलाला एक खरा व्यक्ति बनवायचे आहे.

155 तुम्हाला तुमची लेकरे त्याच प्रकारे पाहीजे की नाही? निश्चितच, सर्वोत्कृष्ट तुम्ही त्यांना देऊ शकता! होय, महाशय. म्हणून जर स्वभाविक वृत्तीचा मनुष्य तसा विचार

करतो. तुम्हाला काय वाटते की, देव त्याच्या लेकरांविषयी काय विचार करतो? सर्वोत्तम जे तो करु शकतो.

156 म्हणून, त्याला असा मनुष्य हवा आहे, जो प्रामाणिक असेल. आता, त्याला असा मनुष्य नको...जो म्हणेल, "आता, बघ माझ्या—माझ्या...लाडक्या, लहानग्या, तू तुला जे हवे ते कर." "ओह, होय, पित्या, त्याचे चांगले चालले आहे, तो चांगला मुलगा आहे." त्याला एक शाबासकी हवी आणि मागे कौतुक हवे. नाही, नाही. अशा शिक्षकाला तो बाहेर घालवून देईल. निश्चितच. त्याला असा मनुष्य पाहीजे जो विश्वासयुक्त असेल. जर तो मुलगा बरोबर वाढत असेल तर, त्याला सांग. जर तो तसा नसेल, जे चुकीचे आहे ते. त्याला सांग.

157 आणि जर पृथ्वीवरील पिता असा विश्वास करतो...तर तुम्हाला एखादा मनुष्य तुमच्याबरोबर प्रामाणिक असावा. असे वाटणार नाही. का, शालेय शिक्षक तुमच्या लेकरांविषयी प्रामाणिक वाटणार नाही का, निश्चितच. अच्छा, तुम्हाला काय वाटते. देव काय विचार करतो? आणि त्याला माहीत आहे; आपल्याला माहीत नाही, ते करतो. आपल्याला मर्यादा आहे, आपण सांगू शकत नाही. परंतु तो अमर्याद आहे. आणि त्याला सर्व ठाऊक आहे.

158 म्हणून, तुम्हाला माहीत आहे पित्याने काय केले? त्याने कधीच सांगितले नाही, "मी माझ्या लेकरांवर लक्ष ठेवण्यासाठी एक पोप नेमणार आहे." त्याने असेही सांगितले नाही, "मी एक—एक बिशप करणार आहे." नाही, नाही, तसे त्याने केले नाही, कारण त्याला माहीत होते की, कारण पोप चुकीचा असणार आहे, तसेच बिशपही असणार आहे. समजले? त्याने कधीच सांगितले नाही, "मी माझ्या मंडळ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी एक सामान्य पर्यवेक्षक ठेवणार आहे." नाही, नाही.

159 त्याच्याकडे पवित्र आत्मा आहे. तो त्याचा शिक्षक होता, त्याची लेकरे वाढविण्याकरिता बरोबर आहे. मग तुम्हाला कसे कळेल की पवित्र आत्म्याला हे माहीत आहे? तो मनुष्याच्या ओठांद्वारे बोलतो. मग तुम्हाला हे कसे कळेल की, तो सत्य बोलत आहे? जेव्हा तुम्ही पाहता पवित्र आत्मा ओठांद्वारे बोलत आहे जे प्रत्येक वेळी तंतोतंत भाकीत करतात आणि अगदी तसेच घडते, जसे शमुवेल बोलला, तेव्हा तुम्हाला कळेल ते सत्य आहे. ते प्रत्ययास येते. कारण परमेश्वर म्हणाला, "जर तो बोलतो आणि तो जे बोलतो तसे घडत नाही, त्याचे ऐकू नका, कारण मी त्याच्या बरोबर नाही. परंतु जर तो करतो, ठीक आहे, मग त्याचे ऐका, कारण मी त्याच्याबरोबर आहे." समजले? तेथे तुम्ही आहात, तशाच प्रकारे तो करतो.

160 आता, मग तो सगळीकडे जातो. आता तुम्ही काय विचार करता की, जर त्याला पित्याकडे वर जावे लागले, तर तो शिक्षक काय सांगेल? आणि म्हणेल, "तुझी—तुझी लेकरे फार वाईट वागत आहेत. मी तुला सांगतो, तो तुझा मुलगा, तो, विश्वासघातकी आहे. तो डफ्फर आहे, मी असा व्यक्ति कधीच पाहीला नाही! तुम्हाला माहीत आहे तो काय करतो? आणि ती तुझी मुलगी! ओह, मला ठाऊक नाही तू तिच्याबरोबर काय करणार आहे? हमम, अच्छा, तुला काय ते माहीत आहे? ती अगदी तिच्यासारखी दिसते...तिने त्यांच्यातल्या काही पलीकडच्या मुलींसारखे तोंड रंगविले आहे. पलिष्टि. होय, महाशय, तिला जसे ते करतात. तसे वागायचे आहे."

"माझी मुलगी?"

161 “होय, तुझी मुलगी.” आज पवित्र आत्म्याला मंडळीविषयी तेच बोलावे लागत आहे. ह्यात आश्चर्य नाही की आपल्याकडे संजीवन येऊ शकत नाही. समजले? आता, ते खरे आहे?

“तुझ्या मुलाविषयी काय? हू? तीच गोष्ट.”

“काय?”

162 “अच्छा, तुला माहीत आहे तू नेहमीच म्हणतो की, ती मेंढरे तेथे वर असलेल्या कुरणात चरली पाहीजे. तेथे वर मेंढरांचे खाणे आहे. होय, तुम्हाला माहीत आहे त्याने काय केले? त्याने त्यांना खाली तेथे त्या रानटी झुडपाच्या ढिगामध्ये नेले आहे. त्यांना तेथून घेतले आणि त्या सर्वांना त्या खाडीमध्ये टाकून दिले, आणि त्यांना त्या रानटी झुडपाच्या ढिगात पडू दिले, जुने वृक्ष खात होते, आणि ते इतके बिचारे आहेत की, ते तेथून निघू शकत नाही.” ते बिशप्स, पाळक जे त्याचे सामर्थ्य नाकारतात…“ठिक आहे, मी तुम्हाला सत्य सांगतो, मी अशा निराश मेंढरांचा समुह माझ्या आयुष्यात कधीच पाहीला नाही.” त्याला ते आवडत नाही, नाही. “आणि तुम्हाला माहीत आहे काय? त्या गाई—गुरांना येथे वर, तुम्हाला माहीत आहे. तुम्ही म्हणता, त्यांना ते खावयास द्या. तो उत्तम प्रतीचा चारा तेथे, तुम्हाला माहीत आहे, त्यांना पुष्ट करण्यासाठी?”

“होय.”

“तुम्हाला माहीत आहे, तो त्यांना काय देत आहे?”

“नाही.”

163 “त्यांना जुने जंगली झुडुप. होय, तो त्यांना संस्थेत सामील होण्यास आणि सर्व गोष्टी करण्यास, भाग पाडत आहे. तू असे तुझ्या आयुष्यात कधीच पाहीले नाही. तू असे तुझ्या आयुष्यात कधीच पाहिले नाही. तुला माहीत आहे तो काय करीत आहे? बाहेर जाऊन ते मोठे सिगार, धुम्रपान फूंकतात, मागे उभे राहतात. त्याच्या बरोबर त्याची पत्नी आहे, ती छोटी विजार घालत आहे. अगदी त्याचप्रमाणे जसे पलिश्ती तेथे बाहेर करत आहेत. होय.” अशाच प्रकारचा संदेश आज पवित्र आत्म्याला मंडळी संबंधी घ्यावा लागत आहे. आता, त्याविषयी काय विचार करत आहात?

164 तेच दत्तकपण आहे. त्याने काय…केले? त्याने दत्तकपणासाठी आपल्याला—आपल्याला अगाऊच नेमले. तो आपल्याला पवित्र आत्मा देतो; परंतु, एक मिनिट थांबा, ‘दत्तकपण’, त्याचविषयी आपण बोलत आहोत. दत्तकपण!

165 “ठीक आहे, तुम्हाला माहीत आहे तो काय करतो? बिशप दुसऱ्या दिवशी आला आणि म्हणाला. त्याची तेथे लहान आरोग्य सभा होती, आणि बिशप आला. कोणीएक गृहस्थ, एक भाऊ, आला आणि आजाऱ्यासाठी प्रार्थना करीत होता. आणि तो म्हणाला, ‘तू ते थांबव!’

“‘ओह, होय, पाद्री बिशप, मी ते करीन.’

“‘तू सहकार्य करीत नाहीस.’

“‘ओह, नाही—नाही. पाद्री बिशप. नक्कीच नाही.’

166 “आणि येथे मी आलो आणि त्याला तुझ्या वचनातून सत्य सांगितले. पाहा, येथे ते आहे. मी त्याला तुझे नियम वाचून दाखवले की, त्याने नक्की काय करावे, आणि तो त्याकडे लक्ष देणार नाही. तो म्हणाला, ‘ओह, ते दुसऱ्या युगासाठी होते, दुसरा मुलगा दुसऱ्या वेळेसाठी आहे. ते माझ्यासाठी नाही’”. तेथेच तुम्ही आहात. तेच, आता तेच सत्य

आहे. मित्रा, आता तुम्हाला समजत नाही की, मंडळी आपली नेमलली जागा गमावत आहे. आपल्याला संजीवन का मिळाले नाही, आपल्याकडे चालत असलेल्या गोष्टी का नाहीत? तेथेच ते पडले आहे.

167 यहोशवा म्हणाला, “गाद, माझी इच्छा आहे की...येथे तुझी जागा आहे, जी नकाशाप्रमाणे आहे, तुझी जागा येथे आहे अगदी येथे. गाद तू येथे ये आणि येथे वस्ती कर. बन्यामीन, तू येथे खाली जा. आणि आता तुम्ही पलिष्ट्यांच्या वेशीपासून दूर राहा.” आणि यहोशवा परत येतो, येथे ते सर्व पलिष्ट्यांमध्ये, एक मोठे जुने वाद्य वाजवीत, अशाप्रकारे नाचत होते, आणि सर्व स्त्रियांनी तोंडे रंगविली होती, आणि सभोवती नाचत होते आणि यहोशवा त्याचे डोके खाजवू लागला, आणि म्हणाला, “आता काय?” आता अगदी तेच घडत आहे. सगळेच नाही, पमेश्वराची स्तुती असो, सर्वच नाही, परंतु पुष्कळजण. ठीक आहे.

168 आता नंतर काय घडते? तेच घडत आहे. तुम्ही अशी कल्पना करु नका, की तो मनुष्य, पवित्र आत्म्याला लाज वाटते जेव्हा पित्यासमोर त्याला हे सांगावे लागते. ओह, माझ्या प्रभू! “मी—मी—मी त्याला ते म्हटले, परंतु तो—तो—तो ते ऐकणार नाही. मी ते त्याला सांगितले. आणि त्याला ते तेथे पुस्तकातून वाचू दे. माझ्याकडे—माझ्याकडे लहान एक सेवक आहे. जो येईल आणि त्याला दाखविला की येशू ख्रिस्त हा काल, आज आणि युगानुयुग सारखा आहे. आणि तुम्हाला काय माहीत आहे? त्याने त्यांच्यातील एकाला जाऊ दिले. त्यांच्यातील एक वृध्द बकरा—चारणारा येथे येऊ दे आणि त्याला सांगू दे की, ते दुसऱ्या युगासाठी होते. समजले? आणि त्याला इतका दुर्गंध आला, जेव्हा तो तेथे गेला, बकरीचा वास, तुम्हाला माहीत आहे, सिगारेट, धुम्रपान आणि तुम्हाला माहीत आहे, आणि असेच पढे, इतका दुर्गंध होता, जेव्हा तो येथे आला. समजले? परंतु मी तुम्हाला सांगतो, त्या बकऱ्या—चारणाऱ्याकडे खूप पदक त्याच्यावर लावलेले होते, कारण, मी तुम्हाला सांगतो, जर तुम्ही त्याचे नाव वर्तमान पत्रात लिहीले, त्याच्या पदव्या लिहीण्यात (त्याचा विषयीचा मृत्युलेख) अर्धे पान लागेल. होय, महाशय, तेथे त्या देशात ते निश्चितच त्याला प्रसिध्द करतात, परंतु, मी तुम्हाला सांगतो, त्याला निश्चितच मेंढरांना कसे चारावे हे ठाऊक नाही. ही त्याविषयी एक गोष्ट आहे. तो माझे बिलकुल ऐकणार नाही,” पवित्र आत्मा म्हणतो, “मी त्याला सांगण्याचा प्रयत्न केला की तू काल, आज आणि युगानुयुगसारखा आहे, परंतु तो—तो हे मुळीच करणार नाही. तो सर्वात भित्रा आहे, मी आजपर्यंत माझ्या आयुष्यात पाहिलेल्यांमध्ये होय आणि मंडळीने त्याला एक अध्यक्ष, एक बिशप, असेच, बनवले आहे, सर्व लोक त्याचे ऐकत आहे. आणि मग काय होते. तुम्हाला माहीत आहे?...त्यांच्याकडे एक लहान जुनी गोष्ट तेथे आहे. ज्याला ते टेलिव्हीजन म्हणतात. तुम्ही ती लहान गोष्ट चालू करतात आणि—आणि त्या स्त्रिया येतात आणि चालू करतात, सर्व प्रकारचे अर्ध नग्न पोषाक. आणि, तुम्हाला माहीत आहे, पुष्कळ तुमच्या मुली...”

“ओह, निश्चितच नाही!” समजले?

169 म्हणाला, “होय, त्या आहेत. होय, त्या ते करीत आहेत. त्यांच्यातील काही संजीवनासाठी ओरडत आहे, पित्या, त्यांच्यातील काही जणांना खरेच ते पाहिजे. त्यांच्यातील काहीजण खरच रेषेवर चालत आहेत, त्यांच्यातील काहीजण त्यांच्याने होईल तितके वचनावर सत्याने उभे राहत आहेत. इतर, मला ठाऊक नाही, काय करावे, ते—ते तेथे मार्ग चुकले आहेत. तुम्हाला माहीत आहे, त्यांच्यातील इतर काय करत आहेत? त्यांची मस्करी करीत आहे, म्हणतात, ते फक्त वेड्यांचा समुह आहेत.”

“बरे, ते मला खुप दुःखी करते.”

170 परंतु आता चित्र बदलू या. आता पिता, त्याचा पुत्र एक चांगला मुलगा आहे. त्याचा पिता बरोबर—बरोबर आहे, येथे पवित्र आत्मा एक शिक्षक आहे. कशा प्रकारे पवित्र आत्मा, तो म्हणतो, “मी चालणार आहे,” शिक्षक म्हणतो, “मी...”

171 मुलगा म्हणतो, “मी तुझ्याबरोबर चालेन. मी तुझ्या अगदी बरोबर जाईन.”

“ओह, टेकडी भयंकर उंच आहे, मुला.”

172 “मी तुझ्याबरोबर जाईन. माझा तुझ्यामध्ये विश्वास आहे. जर मी थकायला लागलो, तो माझा हात वर उचलेल आणि मला धरेल.”

“परंतु तेथे वर टेकडीवर सिंह आहेत.”

173 “काही हरकत नाही. जोपर्यंत तू माझ्या सभोवती आहे, काहीही फरक पडत नाही. मी तुझ्याबरोबर चालत आहे.”

“तेथे वर खडतर आहे, तेथे घसरणारे खडक आहेत.”

174 “मला त्याची पर्वा नाही जोपर्यंत तू माझा हात पकडला आहेस. मी तुझ्याबरोबरच चालेन, मी अगदी तुझ्याबरोबर चालेन.”

“ओह, तुला माहीत आहे काय? पाहा, तुझे वडील ते करीत असत. ते चांगले आहे. होय, महाशय.”

175 तेथे वर त्या टेकडीच्या माथ्यावर जाऊ. “ओह!” तो म्हणाला, “तुला ठाऊक आहे काय पित्या? तुझा मुलगा अगदी त्या जुन्या खडकाचा तुकडा आहे. तो संपूर्णतः तंतोतंतपणे तुझ्यासारखा आहे. प्रत्येक वचन जे तू बोलतो, त्यास तो ‘आमेन’ म्हणतो. दुसऱ्या दिवशी मी—मी त्याला बायबल चाळताना बघितले. आणि तो म्हणतो, ‘येशू, ख्रिस्त काल, आज आणि युगानुयुग सारखा आहे.’ तुम्हाला माहीत आहे. तो काय म्हणाला? तो किंचाळला आणि त्याचे हात हवेत उंचावले आणि म्हणाला, ‘हालेलुयाह! आमेन!’ ओह! आणि तुम्हाला माहीत आहे. ते येथे म्हणते, तुझ्या वचनात तुला माहीत आहे. जेथे तू म्हणालास, ‘जी कृत्ये मी करीतो, ती माझ्यावर विश्वास करणाराही करील.’?”

176 “होय, मला आठवते, ते मी माझ्या पुत्राला लिहीले. होय, मला ते लिहीलेले आठवते.”

177 “ओह, जेव्हा त्याने ते पाहीले, तो ओरडला आणि वर आणि खाली उडी मारली. किंचाळला. हालेलुयाह! प्रभू माझ्यातून सर्व जग काढून टाक! मला त्यासारखे कर! होय, महाशय. आणि त्या सर्व गोष्टी ज्या त्याने केल्या!”

178 “ओह,” पिता म्हणाला, “मी—मी त्या पुत्रासाठी आनंदी आहे. तो एक चांगला पुत्र आहे. ठीक आहे. त्याच्यावर काही वर्षे नजर ठेव. पाहा, तो कसा, पाहा—तो कसा येतो, आणि तो कशी प्रगती करतो.” काही वेळानंतर वर्षे गेली. “त्याचे कसे चालले आहे?”

179 “ओह, माझ्या प्रभू, तो अजून कृपेत वाढत आहे! ओह, माझ्या प्रभू! तो फक्त... मी तुला सांगत आहे, तो खरच...का, तो मेंढरांना घेतो, त्यांना अगदी—अगदी तुझ्यासारखेच सांभाळतो. तो त्यांना समुद्रातील रानटी झुडपे कधीच देणार नाही. तो त्यांना कठीण रानटी झुडपे कधीच देणार नाही. जेव्हा ते सभोवती येतात, म्हणतात, ‘आम्हाला मंडळीत दाखल व्हायचे आहे’; तो म्हणतो, ‘तुमचे तोंड बंद करा, तुम्हाला त्याची गरज नाही! नाही, महाशय. तुम्हाला ह्याची गरज आहे, “पश्चाताप करा आणि तुम्ही

प्रत्येक जण तुमच्या पापाच्या क्षमेसाठी, येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या तुम्हाला पवित्र आत्म्याचे दान मिळेल."' होय, महाशय. तेथे त्याने जे सांगितले ते आहे."

"ओह, त्याने खरंचे ते सांगितले का?"

"होय, महाशय, त्याने निश्चित सांगितले."

"ठिक आहे, त्याचप्रकारे मी ते लिहीले."

"तशाच प्रकारे त्याने ते सांगितले,...!" होय, महाशय.

180 "त्यांच्यातील काहीजण म्हणाले, 'तुम्हाला वरुन सामर्थ्य मिळेपर्यंत यरुशलेम शहरात थांबून राहा पवित्र आत्मा तुमच्यावर आल्यामुळे, यरुशलेमेत, यहुदीयात आणि शोमरोनात, आणि पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल.' जेव्हा त्याने हे वाचले, 'हालेलुयाह, ह्याचीच तुम्हाला गरज आहे!' तुम्हाला माहीत तो काय करतो? तो त्यांना मिळेपर्यंत तेथे खाली त्यांना घेऊन राहीला, ते सर्व आहे, त्यांच्याबरोबर राहीला.

181 "आणि जर ते गडबड करु लागले., तो म्हणाला, 'हूप, हूप, हूप एक मिनिट थांबा, एक मिनिट थांबा. त्याप्रकारे बकऱ्या वागतात, मेंढरे नाही. समजले? समजले? ओह, कधी ते त्याच्यावर चिडतात, परंतु तो त्यांना पाठीवर लहानशी थाप मारतो, म्हणतो, एक मिनिट थांबा. श—श, श—श, श ते बरोबर आहे.' त्याला खरोखरी मेंढरांना कसे नियंत्रण करावे हे ठाऊक आहे. होय, महाशय, मी तुला सांगतो.

182 "तुम्हाला माहीत आहे काय? मी एका *अमुक—आणि—अमुक* आर्च बिशपांना त्याला बोलताना पाहिले की, 'तो ह्या शहरात येऊ शकला नाही आणि सभा भरवू शकला नाही.' परंतु, तुम्हाला माहीत आहे, मी त्याला सांगितले, मी म्हणालो, 'कसेही करुन जा.' समजले? 'ह्या टेप्स काढून टाका, आणि तुम्ही त्यांना बाहेर जाऊ देऊ नका.' आम्ही कसेही करुन गेलो! ह्या शहरात येथे जा, सांगा, 'ठीक, आम्ही...'

183 "आणि तुला माहीत आहे, सैतान तेथे आहे, म्हणतो, 'मी तुझ्याशी पैज लावतो की, मी त्याला त्या शहराच्या बाहेर ठेवू शकतो.' मी म्हणालो, 'तू ते करु शकत नाही.' जर मी त्याला जाण्यासाठी सांगेन, तो जाईल. मी तुझ्याशी पैज लावतो की तो जाईल. 'नाही, नाही, नाही, नाही, नाही, मी त्याला सांगेन. मी खाली जाईन आणि सांगेन, "आता, माझ्या सर्व प्रतिनिधींनो, तुम्ही सर्व एकत्र व्हा. तुम्हाला तेथे कोणत्याही जुना धर्माधती, ते सर्व जुने दैवी आरोग्य आणि त्या जुन्या पवित्र आत्म्याच्या गोष्टी नको. त्या प्रेषितांबरोबर खूप वर्षाअगोदर निघून गेल्या आहेत. तुम्हाला माहीत आहे, त्या तेथे मागे जाणे चांगले नाही." त्यांना त्या जुन्या नको असलेल्या गोष्टी देण्याचा प्रयत्न करतात. ते...

184 "परंतु, तुला माहीत आहे. तेथे खाली गेला तो तरीही तेथे खाली गेला आणि उत्तमप्रतीचा चारा द्यायला सुरुवात केली,...आणि तुम्हाला माहित आहे, त्या मेंढरांनी खायला सुरुवात केली, ते होईल तितके पुष्ट होत चालले आहेत. होय, महाशय, जेव्हा त्यांना आरोग्य मिळत होते आणि सभा होत होत्या आणि तुम्हाला माहीत आहे, त्यांच्यातले खुप तरुण व्याक्तिंनी सुरुवात केली. का, त्यांनी पाहिले की, त्यांच्याकडे मोठ्या गवताच्या उत्तम प्रतीचा चारासारखे आहे. तुम्हाला माहित आहे, त्याने त्याच्यासह काय केले? ते इतके चांगले होते की, ते शेजार्यांकडे धावत केले. म्हणाले, 'ह्याची चव घ्या! ह्याची चव घ्या! ह्याची चव घ्या!' पाहा, तेथील वातावरण येथल्यांसारखेच होते. येथेच ते आहे. ते येथेच आहे. पाहा, 'तुमच्यातील प्रत्येक जणांनी पश्चाताप करा आणि येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घ्या, पाहा, तुम्हाला पवित्र आत्मा मिळेल. हे त्यासाठी

आहे, जो त्याला आत येऊ देईल, त्याला येथे पाहण्यास येऊ दे की, बायबल काय सांगत आहे.' समजले? आणि तेथे खाली ते एक चांगला समय अनुभवत आहेत."

185 "ओह, तोच माझा पुत्र आहे! तोच माझा पुत्र आहे. अच्छा, तुम्हाला वाटते की, तो व्यवस्थित परिपक्व झाला आहे?"

186 "होय निश्चितच," पवित्र आत्मा बोलला. "मी त्याला परिक्षा दिल्या. मुला, मी त्याला *ह्या* प्रकारे पारखले, *त्या* प्रकारे पारखले. मी त्याला खाली आजारपणात फेकले. मी त्याला खाली ठेवले. मी त्याला रागाने पायाखाली तुडविले, मी त्याला सैतानाला त्याला सर्वकाही करु दिले, जे तो करु शकेल. तो पुन्हा परत आला. तो तसाच आला. पाहा, पुन्हा आला. मी त्याला आजारी केले. मी *हे* केले. मी त्याला हॉस्पिटलमध्ये टाकले. मी त्याला येथे बाहेर काढले, मी *हे* केले. मी *ते* केले. मी त्याच्या पत्नीला त्याच्याविरुध्द केले, मी त्याच्या शेजार्यांना त्याच्याविरुध्द केले. मी सर्व गोष्टी फिरवल्या. त्याने किंचितही फरक पडला नाही. म्हणाला, 'जरी त्याने माझा वध केला, तरीही मी त्याच्यावर विश्वास ठेवीन.' मी त्याचे कुटुंब मारले. मी *हे* घेतले, मी *ते* केले, मी *हे* सर्व केले, मी *हे* केले, *ते दुसरे*. तरीही तोवर उभा राहीला, 'जरी त्याने माझा वध केला. तरी मी त्याची सेवा करीन. तो माझा आहे!'"

187 "ओह! ठिक आहे, मला वाटते त्याला आम्हाला, कोठेतरी बोलावावे लागेल, एका लहान खास ठिकाणी आणि तेथे दत्तकपणा घ्यावा लागेल."

188 आता, जुन्या करारात जेव्हा पित्याला ह्याची जाणीव होईल की, त्याचा पुत्र वयात आला आहे, आणि तो दत्तकपणासाठी मुरलेला आहे. त्यासाठी त्यांना ते मूल म्हणून जन्मले, परंतु, तेव्हा तो पुत्र म्हणूनही आहे. परंतु ते मुलाहून अधिक काही नसते, फक्त एक सर्वसाधारण पुत्र, परिपक्व होईपर्यंत आणि ते कोण आहे प्रकट होईपर्यंत. मग, तो त्याला बाहेर बोलावतो.

189 आता येथे आम्ही, मंडळी आहोत. तुम्ही तयार आहात काय? आता उशीर झालेला आहे. प्रत्येक जण जागे व्हा, जीवाला चिमटा काढा, आणि हृदयाला हादरवा, काही वळेसाठी. पाहा? आता आम्ही मंडळीला तिच्या जागी बसवितो आहोत. आता जेव्हा मंडळी तीच्या जागी जर बसविली जाते, तो म्हणतो, "मनश्शे व तुझ्या मालकीचे आहे. एफ्राईम, हे तुझ्यासाठी आहे."

190 मग तो त्याला बाहेर काढून एका निश्चित ठिकाणी आणतो, हे पिता करतो, आणि तो त्याला एका उंच ठिकाणी यासारखे वसवितो आणि तो समारंभ करतो आणि ते सर्व तेथे जमतात. आणि तो म्हणाला, "माझी इच्छा आहे की, सर्वांनी हे जाणावे हे माझे मुल आहे, आणि माझ्या पुत्राला मी दत्तक घेत आहे आणि माझी इच्छा आहे; कोणीही जाणावे की, यापुढे त्याचे नाव...त्याला मी पोषाख घातला आहे, एक खास पोषाख घातला आहे. आणि माझी इच्छा आहे की, तुम्ही जाणावे की, माझे नाव जसे कोणत्याही चेक वर आहे. तेवढेच चांगले नाव त्याचेही आहे. तो माझे मुल आहे, कुटुंबामध्ये त्याला दत्तक घेतले आहे. जरी तो माझा मुलगा जन्मल्यापासून आहे. पवित्र आत्मा मिळाल्यामुळे तो माझा पुत्र झाला आहे. परंतु आता मी त्याला त्याच्या स्थानी अधिकारासह वसवितो. ज्याला तो काढून टाकतो, तो काढला जातो ज्याला तो कामावर घेतो त्याला कामावर घेतो:

191 "आणि मी तुम्हाला खचित, खचित, सांगतो, जर तुम्ही ह्या झाडाला म्हणाल, जर तुम्ही ह्या डोंगराला म्हणाला, 'येथून उपटला जा,' आणि त्यावर जर संशय तुमच्या हृदयात केला नाही, परंतु विश्वास केला की, जे काही बोलत आहे. त्याप्रमाणे घडलेच तर ते तुम्हाला प्राप्त होईल." समजले? येथे तुम्ही आहात; तेथे तुम्ही आहात. पाहा? "तो

माझा पुत्र आहे.” किती जण हे जाणतात की, हा दत्तकपणा,...ते पुत्राला दत्तक घेतात जेव्हा त्याच्यात अमुक आहे हे दिसून येते...ते प्रत्येक जण ज्यांनी बायबल कधी वाचले आहे. त्यांना माहित आहे, पुत्राला त्याच्या ठिकाणी बसवणे.

192 आता, देव तीच गोष्ट आपल्या पुत्राबाबात करतो. जेव्हा त्याने येशूला रुपांतराच्या डोंगरावर नेले. त्याने पेत्र, याकोब आणि योहान यांना वर नेले. ते या पृथ्वीवरील तीन साक्षीदार होते. तेथे येशू होता, मोशे आणि एलिया आणि देव जो त्या डोंगरावर. तेथे त्या डोंगरावर उभे राहिले आणि पहिली गोष्ट तुम्हाला माहीत आहे, त्यांनी पाहिले, आणि येशूचे गौरव त्यांच्या समोर केले गेले. काय हे बरोबर आहे? किती जणांना हे माहीत आहे की हे शास्त्रलेखात आहे? त्याने—त्याने काय केले? त्याने त्याला अमरत्वाचा पोषाख घातला आणि तो म्हणाला, “त्याचे कपडे सुर्यासारखे झळकले” हे बरोबर आहे? आणि एका ढगाने त्यांच्यावर छाया केली आणि पेत्र आणि योहान आणि ते उपडे पडले. आणि त्यांनी पाहिले, आणि तेथे मोशे आणि एलिया उभा राहिला. ते त्याच्याशी बोलत होते आणि मोशे तर मृत्यु पावला होता. अज्ञाण कबरेत त्याला आठशे वर्षापूर्वी पुरले होते. आणि पाचशे वर्षापूर्वी एलियाने स्वर्गात जाण्यासाठी रथ घेतला होता. परंतु ते अजूनही तेथे होते! तेथे ते त्याच्याशी बोलत होते. समजले, त्याने त्यांना पाहण्यासाठी येशूला उंच केले, हे पाहण्यासाठी की, हे सगळे काय आहे? तेथे पाहा, त्याला हे सर्व सांगा आणि ते त्याच्याबरोबर बोलले, आणि त्याच्या बरोबर संभाषण झाले.

193 मग जेव्हा पेत्राने पुन्हा मागे पाहीले आणि येशूचे गौरव करण्यात आले, त्यांनी येशूलाच पाहीले, आणि एक वाणी त्या मेघातून आली, आणि म्हणाली, “हा माझा परमप्रिय पुत्र आहे, तुम्ही त्याचे ऐका! त्याचे नाव चांगले आहे, जसे आज माझे आहे. त्याचे तुम्ही ऐका.” हेच ते आहे. दत्तकपण किंवा पुत्रांना त्या स्थानी वसविणे.

194 आता, इफिसकरांस पत्रामध्ये परमेश्वर प्रयत्न करीत आहे की, पेंटेकॉस्टल चर्च येथे कोठे सापडावे. समजले? तुम्हाला हे समजले काय? आम्हाला येथे बंद करावे लागेल, कारण फार उशीर होत आहे, पाहा, मुलांनाही झोप आली आहे. आणि मला असे हवे आहे की, मी येथे खाली उतरावे येथून या वचनापर्यंत, परंतु मी ते करु शकत नाही. 13व्या वचनापर्यंत पाहा, शेवटचा भाग “पवित्र आत्म्याच्या अभिवचनाने शिक्का मोर्तब केलेले.” आम्ही ते रविवारी पाहूया, समजले? आता पाहा, आता, कसे, आम्हाला काय आत घेऊन येते, आणि आम्ही कसे त्यात राखले जातो.

195 परंतु आता तुम्ही कसे आहात हे “निश्चित” करण्यासाठी? तुम्ही पहिल्याने त्याच्या राज्यात जन्म पावला पवित्र आत्म्याने. किती जणांना हे ठाऊक आहे? ठिक आहे. पुढील गोष्ट, तुम्ही पुर्व नियुक्त कशासाठी आहात? दत्तकपणा हे काय आहे? तुमची नेमणुक पूर्व नियुक्त केलेली आहे.

196 ओह, बहिण स्कॉट, मी असा विश्वास करतो की, तेथे बसलेली आहे. तुम्ही ते एक नाही का, जे आज तुम्ही तेथे वर होता? एक शिक्षण सगळीकडे चालले आहे. जग भरात, कुठेतरी अनेक राष्ट्रांमध्ये वेगवेगळया ठिकाणी मी त्या विषयी ऐकले आहे. खुप काही, येशू हा पृथ्वीवर एका शरीरात सगळीकडे चालत आहे. तो येतो आणि *असे* करतो. हे फसवेपणा आहे! त्याचा पवित्र आत्मा येथे आहे, तो आपल्या मंडळीला तिच्या जागी नेमण्यास प्रयत्न करीत आहे, यासाठी की मंडळी व्यवस्थेमध्ये यावी. अभिवचनाच्या भूमित त्यांना वसवित आहे. म्हणजे ते त्याचा त्यात प्रवेश करतील...म्हणजे सर्व शत्रू जे आहे, ते त्यात बाहेर घालवून दिले जातील.

197 मनश्शे त्याची भूमी घेऊ शकत नाही. मला आरोग्य प्राप्त होण्याच्या सभा घेता आल्या नाहीत. जेव्हा अर्धे जण...मी तेथे बाहेर जाऊन प्रचार केला. येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घेण्याबद्दल आणि त्रैक्यावर विश्वास करणारे बंधुजन म्हणता येत, "ओह, तो जुना ओन्ली जीजस मानणारा आहे." आणि येथे मी जाऊन दैवी आरोग्यासाठी काही करु शकत नाही. कारण जेव्हा अर्धे जण म्हणतात, "आरोग्य वरदान ठिक आहे," आणि पुष्कळजण प्रभुच्या चमत्काराचा आनंद लुटतात आणि म्हणतात, ठीक आहे, मी विश्वास करतो की, "भाऊ ब्रॅन्हम हे एक संदेष्टे आहे. परंतु मला तुम्हाल काही सांगू दे. जीतपर्यंत त्याच्यावर आत्मा असतो, आणि तो पारख करत असतो, तो प्रभूचा दास आहे, परंतु त्याची शिकवण सडलेली आहे. ती चांगली नाहीए." अशा प्रकारचा मुर्खपणा कोणी कधी ऐकला आहे का? ते देवापासून असेल किंवा देवापासून नसेल. ही हे खरे आहे. सर्व देवापासून असेल किंवा देवापसून नसेल. ह्याप्रमाणे हे आहे. परंतु तुम्ही कसे मिळवणार? मनश्शे आपले स्थान राखत नाही, एफ्राईम आपले स्थान राखत नाही, गाद आपले स्थान राखत नाही, बन्यामीन आपले स्थान राखत नाही. ते सर्वजण पलिष्ट्यांच्या मागे धावत आहेत, आणि सर्वकाही मिलावट. आम्ही कसे स्थानावर नेमले जाऊ? परंतु आम्ही सर्वजण तर पवित्र आत्म्याच्याद्वारे जन्मलेले आहोत. हे खरे आहे ना. कशासाठी आम्ही जन्मलो आहो? पर्वनियुक्ति...मग आम्ही नव्याने जन्मल्यावर, आम्ही दत्तकपणासाठी पूर्व नियुक्त झालेलो आहो, ह्यासाठी की, ख्रिस्ताच्या शरीरामध्ये नेमणूक व्हावी. समजले मला काय म्हणायचे आहे?

198 ख्रिस्ताचे शरीर काय आहे? काही प्रेषित आहेत, काही संदेष्टे आहेत, काही शिक्षक आहेत आणि काही सुवार्तिक आहेत आणि काही पाळक आहेत. हे खरे आहे ना? आम्ही बोलावलेले आहो. दुसर्यांना भाषेची दाने, भाषांचे अनुवाद करण्याचे दान. ज्ञान, बुध्दी, चमत्कार, अद्भुते करण्याची अशी सर्व दाने आहेत. आणि आता ते काय करतात? ते त्या संबंधी सराव करतात, म्हणजे? त्याला तसे ढिले चालू दे, जसे मला काही माहित नाही. एक उठतो, भाषांमध्ये बोलला, आणि दुसरा बोलत पुढे निघून गेला. (ब्रदर ब्रॅन्हम एका आवाजाद्वारे अव्यवस्था आणि गोंधळाची नक्कल करुन दाखवितो.) तीच गोष्ट. प्रचारक प्रचार करील, आणि वेदीजवळ बोलावील, आणि कोणीतरी उठतो, आणि अनन्य भाषेत बोलतो. "हालेलुयाह, देवाला धन्यवाद!" जर—जर प्रचारक संदेशाबरोबर जातो. अभिषेकाखाली, तर मग लोक म्हणतात, "हा तो जुना परत पतीत झालेला." समजले, कारण त्यांना तसे शिकवीत नाहीए.

199 बायबल म्हणते, सदेष्ट्यांचे आत्मे संदेष्ट्यांच्या स्वाधीन आहेत देव हा अव्यवस्थेचा देव नाहीए. जेव्हा मी उभा राहतो, किंवा एक सेवक देवाच्या अभिषेकाखाली असतो. तुम्हाला किती अनन्य भाषा बोलायला वाटो, तुम्ही आपल्या शांतीत राहा जीथपर्यंत देव येथे संपवीत नाही. मग जर तुम्ही अनन्य भाषेत बोललात, तर ते काही वारंवार वचने बोलत राहणे नाहीए, कारण देव म्हणतो, व्यर्थ बडबड करु नका. परंतु हा एक संदेश प्रत्यक्ष कोणा व्यक्तिसाठी असतो. मला विचारा एकदा तरी, एका वेळी बोट करुन सांगा की, कधी पवित्र आत्म्याने, कोणाची पारख करीत असता, वारंवार तीच वचने बोलून बडबड केली आहे. हे त्यांना सांगितले जाते की, त्याच्याशी काही चुकीचे आहे आणि कोणी काही केले आहे तर, आणि त्यांनी जे करायला हवे, किंवा काही घडणार असेल किंवा असेच काही. हे सत्य आहे ना?

200 म्हणून अन्य भाषेत बोलणे आणि अनुवाद करणे! जर कोणी मंडळीत आहे, जो अन्य भाषेत बोलत आहे आणि दुसरा त्याचा अनुवाद करीत असेल, त्याला ते सांगू द्या. ब्रदर नेव्हील यांना उठून अन्य भाषा बोलू द्या. आणि हा भाऊ त्याचा अनुवाद करो आणि म्हणो.

"त्या माणसाला सांग, काल तो बाहेर गेला आणि जे करायला नको, ते त्याने केले. आता डॉक्टरने आज त्याला सांगितले आहे की, त्याला कर्करोग झाला आहे. जा आणि ती गोष्ट सरळ करा, मग परत या आणि देवाबरोबर खरे राहा."

तो मनुष्य म्हणो, "खरेच, हे सत्य आहे" मग देव तुमच्याबरोबर आहे.

201 परंतु दुसऱ्या बाजुने पाहिले, तर आम्ही ते कसे करु शकू? पाहा?...(भाऊ ब्रॅन्हम अव्यवस्थेचा आणि गोंधळाच्या आवाजाची नक्कल करतात.) सहजगत्या काहीही असो नेमणूकच नाही. आता ते...पाहा, इफिसकरास प्रयत्न करीत आहे...पाहा, ते त्याला मुकले. पाहा, ते कसे त्याला मुकले? आम्ही दत्तकपणाचे पुत्र बनण्यासाठी पर्वनियुक्त आहोत. आता किती जण हे समजत आहेत. माझे म्हणणे काय आहे? तुमचे हात मला उचलून दाखवा. दत्तकपणा. आम्ही देवाच्या आत्म्यात जन्म पावलेलो आहोत. खात्रीने पवित्र आत्मा स्विकारला आहे आणि हाक मारतो. "अब्बा, बापा, हालेलुयाह, देवाला धन्यवाद." आम्ही, आहो हे खरे आहे. आम्ही मुले आहोत. परंतु आम्ही ते कुठेही मिळवू शकत नाही. आम्ही त्या पलिष्ट्यांना त्यासाठी फतवा काढु शकत नाहीत.

202 बिली ग्रॅहमकडे पाहा, जे तेथे उभे आहेत. मुसलमान सांगतोय. "हे सिध्द कर."

203 पलिकडे तो जॅकको कडे पाहा. आणि तो नास्तिक, ज्यांना ख्रिस्ताशी हस्तांदोलन तेथे केले. चर्च ऑफ क्राईस्ट ह्यांनी आणि हात पकडत आहेत. ते तर ख्रिस्ती बनायला हवे आणि जोई लुईससारख्या सैतानाबरोबर हात मिळवत आहेत. आणि एक स्वातंत्र्य विचार सरणीचा आणि देवाला शाप देणारा आणि म्हणाला, "हे सर्व खरं असलं तरी, सुरुवातीपासूनच देव म्हणून कोणी नाही," आणि अशा सर्व गोष्टी आणि एक मंडळी जी स्वतःला चर्च ऑफ क्राईस्ट म्हणवते, आणि त्याच्याशी हात मिळवणी करते आणि भाऊ जेक कोईच्या विरुध्द बाजू होतात. आम्ही कसे काय सर्व करणार? आणि जे पेंटिकॉस्टल्स पुष्कळत्यापैकी त्याच्याविरुध्द आहेत. जेव्हा प्रत्येक प्रचारक आमच्या देशात जो त्याच्यासाठी आपला खांद्याला खांदा लावून उभा राहायला हवा आणि म्हणाला, "परमेश्वरा, तुझे सामर्थ्य खाली पाठव." तेथे आम्ही आहोत, जेथे ते स्थापले जाणार नाहीत.

204 एफ्राईम थांबू इच्छित नाही. त्यांच्यातील एक तेथे गेला आहे, आम्हाला दिसते मनश्शे येथे जात आहे. म्हणतात, "ओह, बाप रे, प्रभूने मला चांगले असे मक्याचे शेत दिले आहे!" मग येथे येतो, गाद, म्हणतो, "ठीक आहे, आता एक मिनिट थांबा. मी सातू उपजवणार होतो, परंतु मी आता धान्यही उपजवू इच्छितो, हालेलुयाह!" तुम्हाला समजले? तुम्हाला त्या धान्याशी काय करायचे आहे? सातू घ्या. तुम्हाला उभारण्याचा भाग सातूमध्ये आहे. तुम्ही मेंढरे पाळू शकत नाहीत. जेव्हा तुम्हाला गुरे—ढोरे पाळायचे आहे. देव इच्छितो की, मंडळी त्याने योग्य जागी वसवावी. परंतु त्यांच्यांतील प्रत्येक जणाची तीच गोष्ट करण्याची इच्छा आहे. "हालेलुयाह!" परंतु त्याच्यातच त्यांना काही गोष्ट सांगू शकत नाहीत. नाही, नाही. त्यांच्यात तो बकऱ्याचा स्वभाव आहे. "बट, बट, बट, बट, बट, बट, बट." पाहा, तुम्ही त्यांना सांगू शकत नाहीत. हे खरे आहे. आता, हे सत्य नाही काय? आणि तुम्ही मंडळीला तसे वसवू शकत नाही. समजले?

205 मंडळी ही वास्तविकरित्या मुलांच्या दत्तकपणासाठी पूर्वनियुक्ती केलेली आहे, जेथे एक मनुष्य...देव एका मनुष्याला घेऊन आणि त्याला कुटुंबामध्ये दत्तकपणा देतो, आणि त्याला काही देतो. ते, पहिले, प्रयत्न करुन बघा की, जर सत्य आहे. बायबल म्हणते, आत्मे पारखा. हा मनुष्य काही दावा करतो, प्रयत्न करा आणि पाहा, जर ते बरोबर आहे, तर त्याबरोबर पुढे चाला. मग म्हणाले, "प्रभू आम्हाला दुसरे काहीतरी पाठव." पुढे

सरकत राहा, पाहा. पुढे जात राहा, जीतपर्यंत प्रत्येक व्यक्ती आपली जागा घेत नाही. मग तुम्ही देवाची मंडळी पाहू शकाल की, जी आपली जागा घेण्यास सुरुवात करते. तेव्हाच जेव्हा पलिष्टी टेका देण्यास जातील. तोकडे कपडे निघून जातील, केस लांब वाढतील, चेहरे धुतलेले असतील; सिगारेट गायब होईल. हे खरे आहे. जेव्हा मंडळी ही मोठ्या सामर्थ्यात येण्यास सुरुवात करील, जेव्हा आम्हाकडे हन्ना व सप्पीरा असतील, आणि त्यांच्यातील काही. होय, महाशय. जेव्हा तुम्ही पाहाल, पवित्र मंडळी आपल्या सामर्थ्यात एकत्रित उभी राहील, देवाचे पुत्रांतून त्यांच्याजागी स्थापले जातील, देवाच्या कुटुंबात त्यांना दत्तकपणा दिला जाईल. महासामर्थी मंडळी अशी ती गौरवात उभी राहील. ओह, त्यासाठीच तर तो येत आहे.

206 पाहा, भावांनो, आम्ही किती दूर गेलो आहोत, तुम्ही पवित्र वचनांवरही एकत्र नाही होत आणि कोणीही मनुष्य, कोणीही मनुष्य जो पाण्यातील येशू ख्रिस्ताच्या नावाचा बाप्तिस्मा बायबलमध्ये पाहत नाही, तो कदाचित आंधळा असेल किंवा तो मानसिकरित्या बरोबर नाही. हे सत्य आहे आणि तेथेच कुठे हा मोठा संघर्ष आहे.

207 मी—मी कोणत्याही व्यक्तिला सांगेन की, त्याने मला एकतरी शास्त्र वचन दाखववे. जेथे नविन मंडळीमध्ये कोणातरी व्यक्तिचा बाप्तिस्मा हा येशू ख्रिस्ताच्या नावाखेरीज दुसऱ्या कोणत्यातरी नावाने झाला आहे. किंवा जर त्याचा बाप्तिस्मा हा दुसऱ्या पद्धतीने झाला असेल, तर त्याला पुन्हा बाप्तिस्मा येशू ख्रिस्ताच्या नावाने घ्यावा लागेल पवित्र आत्मा प्राप्त करण्यासाठी. तुम्ही या मला दाखवा. तेथे तसे नाहीए. तशी आज्ञाही नाहीए. जेव्हा येशूने तेथे म्हटले, "तुम्ही जा राष्ट्रांना शिकवा. त्यांना पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या." पिता, पुत्र आणि पवित्र आत्माही नावं नाहीत, एकही नाव त्याच्यामध्ये नाही. पेत्र वळला, दहा दिवसानंतर म्हणाला, "पश्चाताप करा आणि बाप्तिस्मा घ्या, प्रत्येक जण तुमच्यापैकी, येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये, तुमच्या पापांचे मोचन व्हावे म्हणून." आणि हे बायबलमध्ये कुठेही दिसते.

208 आणि मग येथे काही बाप्तिस्मा घेतलेले होते, काही दुसऱ्या प्रकारे, योहानाकडून, फक्त पश्चातापाचा होता. पौल म्हणाला, "तुम्हाला पुन्हा बाप्तिस्मा घेतला पाहिजे. तुम्हाला परत यावे लागेल."

209 "ओह, परंतु आमचा महान पवित्र मनुष्य, योहानाकडून बाप्तिस्मा झाला आहे. त्याने येशूला बाप्तिस्मा दिला आहे."

210 "ठिक आहे, ही सुवार्ता आहे. हा देवाचा आत्मा आहे तो माझ्यावर प्रकट करण्यात आला आहे. मी प्रभूचा एक प्रेषित आहे, आणि जर स्वर्गातून कोणी एक दूत येईल आणि दुसरे काही प्रचार करील..."

211 मला ते वाचू द्या. बायबल म्हणते, "जर..." पौल म्हणाला, "जर कोणी स्वर्गातील दूत काही म्हणाला," बिशप, आर्च बिशप, पोप, कोणी पाहणारा, तो कोणीही असो, "जर तो या बाहेर काही प्रचार करीत असेल, जे मी तुम्हाला प्रचार केले, तर तो शापभ्रष्ट असो."...आमच्यात तशा पध्दतीची रित नाहीए. नाही, महाशय...तेथे असे काही नाहीए. तुम्ही...आणि मग—मग पाहा, का बरे लोक हे पाहू शकत नाहीत? का बरे लोक यावर विश्वास करीत नाहीत. [सभेतील कोणी एकाने म्हटले, "पूर्वनियुक्ती"—संपा.] पाहा. कोणीतरी तेथे बरोबर सांगितले आहे, जीन, "पूर्वनियुक्ती," तंतोतंत का? "जे सर्व पित्याने मला दिले आहेत" ते (काय?) "माझ्याकडे येतील." किती तंतोतंत! "सर्व जे पित्याने मला दिले आहेत, ते येतील ते माझ्याकडे येतील." माझ्याशी काय चालले आहे, मी शोधण्याचा प्रयत्न करीत आहे? आम्ही येथे आहोत. ठीक आहे.

212 मला फक्त ते वचन वाचू द्या आणि मग मी सांगतो की पौल, ज्या गोष्टी,...जो संदेश आज रात्री मी प्रचार केला, येथे जेथे पौल पुर्वनियुक्तीवर बोलतो, येशूच्या नावातील बाप्तिस्म्याबद्दल, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा, मंडळीतील जी व्यवस्था आणि असे अनेक येथेच कोठे तो म्हणाला,

> *मला आश्चर्य वाटते,* (गलतीकरांस तो हे सांगत आहे) *की, ज्याने तुम्हास ख्रिस्ताच्या कृपेत पाचारण केले, त्याच्यापासून* तुम्ही *इतके लवकर अन्य सुवार्तेकडे वळत आहोत...ख्रिस्ताची कृपा...*

> दुसऱ्या शब्दांत मला, तुमची लाज वाटते की, तुम्ही कोणाला तरी आत येऊ दिले आणि यापासून बहकू दिले, *दुसऱ्या सुवार्तेकडे.*

> *ती दुसरी नाही; पण तुम्हास घोटाळयांत पाडणारे, व ख्रिस्ताची सुवार्ता* विपरीत *करु पाहणारे, असे कित्येक आहेत.*

213 परंतु पाहा आता, आठवण करा, तो पौल होता, जो प्रत्येकांविषयी अस्वस्थ होता. ज्यांनी येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घेतला नव्हता. त्यांनी यावे आणि पुन्हा येशू ख्रिस्ताच्या नावात बप्तिस्मा घ्यावा. किती जणांना हे माहित आहे की, हे सत्य आहे? किती जणांना हे माहीत आहे की, तो पौल होता ज्याने सांगितले की, जे रहस्य या जगाच्या स्थापनेपासून गुप्त ठेवले होते. ते त्याला प्रकट करण्यात आले आणि दत्तकपणासाठी पूर्वनियुक्त केलेले असे पुत्र ठरावे. म्हणून तो पौल होता. येथे पाहा, त्याने काय सांगितले.

> *परंतु जी सुवार्ता आम्ही तुम्हाला सांगितली, तिच्याहून निराळी सुवार्ता आम्ही सांगितली किंवा स्वर्गातून आलेल्या देवदूताने सांगितली, तरी तो शापभ्रष्ट असो.*

214 फक्त असे म्हणू नका, “महाशय, मी तुमच्याशी सहमत नाही.” तो शापभ्रष्ट असो. मला, पढचे वचन वाचू द्या.

> *आम्ही अगोदर सांगतले, तसे मी आताही पुन्हा सांगतो की, जी तुम्ही स्विकारली, तिच्याहून निराळी सुवार्ता कोणी तुम्हास सांगितल्यास तो शापभ्रष्ट असो.*

215 हे खरे आहे. आता, भाऊ, बहिण, जर त्या दिवशी तो जर तो देव आहे, आणि मी—मी जे बोलले मला आशा आहे की, ते अनादरशील नाहीए, ज्यामुळे मी बारकाईने पाहतो...आता, मी उत्साही आहे; मला नाही वाटत मी उत्साही आहे; मी प्रचार करताना धन्य होतो, मला त्याचा अतिशय आनंद होतो. मी तुम्हाला थांबवून ठेवले आहे, मला कळेपर्यंत का तुम्ही थकला आहात व झोप येत आहे. परंतु ओह...जर तुम्ही, जर तुम्ही हे जाणाल की माझी किती इच्छा आहे की, तुम्ही तेथे असावे पाहीले? आणि जेव्हा मी पुन्हा एकदा तुम्हाला सांगतो, जेव्हा मी...जेव्हा तो म्हणाला, मी म्हणालो...मी म्हणालो, “तो असे करील...”

तो म्हणाला, “काय तम्ही पाहू इच्छिता की, अंत काय आहे?”

216 आणि मी मागे पाहिले आणि मला त्या बिछान्यावर पडलेले ते पाहीले. खात्रीपूर्वक तुम्ही मला खुप ओळखता हे जाणण्यासाठी की—की—की मी तुम्हाला सत्य ते सांगत आहे. मला तुम्हाला काही विचारायचे आहे, जसे शमुवेलाने शौलाला अभिषेक करण्यापूर्वी म्हणाला, मी तुम्हाला प्रभूच्या नावाने कधी काही सांगितले काय? परंतु सत्य तेच सांगितले ना? हे खरे आहे ना? ते कायम खरेच आहे. मी कधीतरी तुमच्याकडे पैसे मागितले काय? किंवा त्यासारखे काही? नाही, पाहा. मी कधीच मागितले नाहीत. मी

कधी असे काही केले आहे? परंतु ख्रिस्ताकडे वळविण्यासाठी मी माझा उत्तम प्रयत्न केला आहे? एकदम खरे आहे.

217 आता ते म्हणू इच्छितात की, मी मानसिक संमोहन करणारा आहे, तुम्ही जाणता, एक उत्तम ज्ञानेंद्रीयांचा आकलन शक्ती देणारा, अर्थात अशा गोष्टी पुन्हा येणारच बायबल म्हणते, ते तसे करतील. जसे यान्नेस आणि यांब्रेसने मोशेला अडविले, त्याचा देखावा दिसेपर्यंत जसे मोशेने केले होते, तसेच जवळजवळत्यांनी ही केले. हे खरे आहे. परंतु आठवण ठेवा, याब्रेस आणि यान्नेस यांना बरे करता आले नाही. ते आरोग्य देऊ शकले नाहीत. ते पीडा आणू शकत होते, परंतु त्या घालवू शकत नव्हते. समझले? ठीक आहे. आता देव बरे करणारा आहे. देवाचे वचन खरे ठरते.

218 मी तुमच्याशी प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न केला आहे. मी तुम्हाला सत्य सांगण्याचा प्रयत्न केला आहे. मी—मी...जवळ जवळएकतीस वर्षे केला आहे, मी या प्रचार वेदीवर उभा राहिलो आहे, एक तीस वर्ष आणि कधीतरी मी या प्रचार वेदीवरुन गौरवात जाऊ शकतो. तेथे एक पत्नी, एक मुलगी, पिता, भाऊ हे सर्व तेथेच पलिकडे पुरण्यात आले, काही मौल्यवान मित्र. मी त्यांची दफन पेटी आणि त्यावर ठेवलेली फुले येथे पाहिली आहेत. आणि मला माहित आहे कधीतर माझीही, तशीच असेल. आता, हे खरे आहे. परंतु प्रामाणिकपणे, माझ्या ह्रदयातून, मी माझ्या ह्रदयातून सांगत आहे, मी विश्वास करतो की, मी तुम्हा जवळ प्रभू येशू ख्रिस्ताचे खरे शुभवर्तमान प्रचार केले आहे. मला वाटते की, तुम्ही बाप्तिस्मा घेतला पाहीजे, तुमच्यातील प्रत्येकाने, येशू ख्रिस्ताच्या नावात, आणि पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा घ्यावा. आणि जेव्हा कधी तुम्ही करता, ते तुम्हाला आनंद, शांती, सहनशीलता, चांगुलपणा, नम्रता, लीनता, धीर, विश्वास घेऊन येतील.

219 आणि त्या दिवशी, मला माहित नाही, त्या सकाळी माझ्याशी काहीतरी घडलं. मी हे काही अजूनही सांगू शकत नाही की, मी शरीरात होतो, अथवा मी दृष्टांत पाहत होतो किंवा मला येथून तेथे उचलण्यात आले. मला माहीत नाही, मी काही सांगू शकत नाही. मला एकच गोष्ट माहीत आहे की, मी—मी नेहमी मृत्यु होईल याला घाबरत असे. ती नांगीची छोटी जागा. परंतु यासाठी की येशू मला घ्यायला येणार नाही. मी त्याला घाबरलो नाही, कारण या गोष्टीविषयी मी घाबरलो नाही. परंतु मी जर तुम्हाला भेटून जर एका लहान धुक्यासमान जर वाहवत राहिलो. परंतु आता मी पाहतो. जेव्हा मी लोकांना पाहिले, ते खरेच होते. आणि ते लोक या पृथ्वीवर माझ्या बरोबरीचे होते, माझ्या पहिल्या बायकोच्याही सोबतीचे. ती माझी बायको नव्हती, ती माझी बहिण होती. तीने मला पती म्हणून बोलावलं नाही, तिने मला तिचा प्रिय भाऊ बोलावले. तेथे काही लिंग नाही, त्याप्रकारची भावना ही नाही, ती असूच शकत नाही, ती परिपूर्ण होती, ती फार मधुर होती, ती परिपूर्णतः होती.

मी आश्चर्य करीत आहे, मला माहीत नाही, मी आश्चर्य करीत आहे: तिने हेच पाहिले काय, तिने हे जग सोडण्याअगोदर जेव्हा ती त्या इस्पितळाच्या पलिकडे होती, जेव्हा मी तिला बोलावले? आणि ती म्हणाली, "बीली तू याविषयी प्रचार केला आहेस, त्याविषयी बोलला आहेस. परंतु," ती म्हणाली, "तुला माहीत नाही ते काय आहे." ती म्हणाली, "माझी अजून राहण्याची इच्छा नाहीए."

220 मला आश्चर्य वाटते हे जर तसे असेल, जसे एक देवभक्त व्यक्ती संतजनातला वयस्कर व्यक्ति एफ एफ बोसवर्ध, जो या प्रचार वेदीवर उभा राहीला. ज्याने माझ्याबरोबर जगाच्या विविध भागामध्ये प्रचार केला. तो वृध्द यफ.यफ बोसवर्ध तुम्ही जवळजवळ सगळे त्याला ओळखता. देवभक्त असा संत असा वृध्द पुरुष. दोन तासा अगोदर, एक

आठवडा किंवा 2आठवड्यापूर्वी जाण्याअगोदर, मी त्याच्याकडे गेलो होतो आणि तेथे तो पडून होता, जवळजवळ नव्वद वर्षाचा. त्याचे ते लहान वृध्द हात पोहचले, त्याचे ते टक्कल पडलले डोके आणि पांढरी दाढी वाढलेली. मी त्या वृध्द व्यक्तिला माझ्या बाहूत घेतले आणि मी किंचाळलो, “माझ्या बापा, माझ्या बापा, इस्त्राएलाचे रथांनो आणि त्यावरील घडेस्वारांनो.”

जर तेथे असा कोणी मनुष्याने पेंटिकॉस्टला दर्शवित असेल आणि एक खरा प्रेषित, तर तो एफ. एफ. बोसवर्ध, स्वच्छ, सरळ, खरे शुभवर्तमान, पाहा. तो बोसवर्ध होता. आणि जेव्हा मी त्याला माझ्या बाहुत घेतले, आणि मी किंचाळलो, “माझ्या बापा, माझ्या बापा इस्त्राएलाच्या रथांनो आणि त्याच्यावरील घोडेस्वारांनो.”

221 तो म्हणाला, “मुला, तू मळयात काम कर.” म्हणाला, “या तरुणांतील काहींना परदेशी मळयासाठी तयार कर, जर तू हे करु शकशील, खूप धर्मांधता येण्यापूर्वी हे कर, मुला त्यांना खऱ्या सुवार्तेकडे ने. जी तुझ्याजवळ आहे.” तो म्हणाला, “तुझ्या त्या सेवकाईला अजून सुरुवात झाली नाही, जशी असायला हवी.” म्हणाला, “तू अगदी नविन ब्रॅन्हम आहेस.” म्हणाला, “मुला, तू तरुण आहेस.”

मी म्हणालो, “ब्रदर बोसवर्थ मी अठ्ठेचाळीस वर्षांचा आहे.”

222 तो म्हणाला, “तुझी अजून सुरवात झाली नाहीए.” तो म्हणाला, “या तरुण प्रचारकांना त्याच्या पुष्कळप्रकारचे निरर्थक कृतीत ते जाऊ देऊ नकोस, आणि विष कालवू देऊ नको. तुझ्या जाण्याअगोदर ते—ते सर्व कारस्थानी आत येऊन संपूर्ण देशाला तुला विरुध्द न करो.” म्हणाला, “भाऊ ब्रॅन्हम तू पुढे हो, शुभवर्तमानासह जा जे तुला मिळाले आहे.” तो म्हणाला, “मी—मी विश्वास करतो की, तू एक प्रेषित आहे, किंवा प्रभू आमचा देव याचा एक संदेष्टा आहेस.”

223 मी त्याच्याकडे पाहिले, मी त्याला आपल्या मिठीत घेतले. मी म्हणालो, “भाऊ बोसवर्थ, मला तुम्हाला एक प्रश्न विचारायला वाटतो. तू जो प्रचार केला, त्या वेळेतील सर्वात आनंदी...क्षण...काय होता?”

तो म्हणाला, “भाऊ ब्रॅन्हम, तो आताचा क्षण आहे.”

मी म्हटले, “तुला माहीत आहे की, तू मरणार आहेस?”

तो म्हणाला, “मी मरणार नाही.”

मी म्हणालो, “काय...हा क्षण तुझ्यासाठी फार आनंदाचा आहे. असे तू का म्हणालास?”

224 तेथे एक लहान दरवाजा होता. तो म्हणाला, “मी येथे पडून आहे आणि माझे तोंड त्या दरवाजाकडे वळाले आहे. कोणत्याही क्षणी, आता ज्यांच्यावर मी प्रेम केले आणि ज्यांच्यासाठी मी प्रचार केला, आणि उभा राहीलो. ते सर्व...माझे जीवन, तो त्या दरवाजाजवळ माझ्यासाठी येईल, आणि मी त्याच्याबरोबर जाईन.” मी त्याच्याकडे पाहीले, मला वाटले, मी—मी तेथे पाहत होतो, जसे मी अब्रहाम, इसहाक व याकोब यांना पाहावे.

225 मी त्याचा हात पकडला, मी म्हणालो, “भाऊ बोसवर्थ, आपण दोघे एकच देवावर विश्वास करतो. आपण एकच विश्वास ठेवला आहे. देवाच्या कृपेने माझ्या शरीरातून शेवटला श्वास जाईपर्यंत मी प्रचार करीन. मी देवाशी सत्य राहीन, कारण मला माहीत आहे. कसे राहायला हवेय. मी सुवार्तेवर कुठल्याही बाजूला किंवा कुठल्याही ठिकाणी तडजोड करणार नाही. मी तितका प्रामाणिक राहीन. जितके प्रामाणिक राहणे मला माहीत आहे.

भाऊ बोसवर्थ, मी तुम्हाला त्या उत्तम देशात भेटेन जेथे तुम्ही तरुण...असणार नाही; किंवा ह्यापुढे वृध्द असणार नाही, परंतु तरुण."

226 तो म्हणाला, "भाऊ ब्रॅन्हम, तू तेथे असशील, तू काळजी करु नको."

227 आणि एका तास अगोदर, दोन तास मरण्याअगोदर...अंदाजे दोन महिन्यानंतर, मला वाटते. तेव्हा त्याच्या मृत्युच्यावेळी, माझी पत्नी आत आली आणि त्याला पाहीले. (तो नेहमीच तिचा पुष्कळविचार करी.), आणि मग श्रीमती बोसवर्थ. आणि अंदाजे दोन तास ते पडलेले, झोपलेले होते. तो उठला, त्यांनी बघितले, आणि ते त्यांच्या पलंगातूनच उड्या मारु लागले. तो म्हणाला, "आई, बरे, मी तुला फार वर्षापासून तुला पाहीले नाही! बाबा! भाऊ जीम, का" म्हणाला, "आपण पाहूया, तू माझ्या द्वारे जायलेट लनाई येथे आलेल्यामधील एक होता." तो पन्नासवर्षे मृत होता. समजल? होय! तो म्हणाला, "तू बहिण *अमुक—अमुक* आहेस. होय, मी तुला प्रभूकडे वीनीपेग सभेत नेले. होय, का, येथे *अमुक—अमुक* बहीण आहे? मी तुला पाहीलेले नाही...होय, पाहा तू *अमुक—अमुक* येथे प्रभूकडे आलीस." आणि थेट दोन तास तो त्यांच्याशी हात मिळवीत होता. ज्यांना त्याने प्रभूकडे नेले होते. त्याच्या ठीकाणाकडे परत चालत गेला आणि बसला, त्याचे हात एकावर एक ठेवले, आणि ते तेच होते. काय भाऊ एफ.एफ. बोसवर्थने त्या देशात प्रवेश केला, जे येशूने मला त्या दुसऱ्या रात्री दाखविले? जर ते आहे, तो तेथे आज रात्री एक तरुण मनुष्य आहे. परमेश्वराने त्याच्या जीवाला विसावा दिला. आणि मी आजतागयत इतका विश्वासू राहो की, मी त्या देशात प्रवेश करीन आणि मी ख्रिस्ताचा एक—एक प्रामाणिक सेवक होवो!

228 मला माझ्या जीवनाची लाज वाटते. मला लाज वाटत आहे, मी—मी—मी...जर मी तुम्हा लोकांआधी पाप केले आहे. तुमचे—तुमचे कर्तव्य आहे की माझ्याकडे यावे व मला सांगावे, समजले? मी सर्व गोष्टीत जसे परमेश्वराने त्याच्या कृपेने मला दाखवले तसे प्रामाणिकपणे जगण्याचा प्रयत्न केला. समजले? समजले? परंतु, पाहा, मित्रांनो, तुमचे माझ्याशी कर्तव्य आहे की, जर तुम्हाला काही माहीत आहे जे माझ्या जीवनात चुकीचे आहे, माझ्याकडे येऊन मला ते सांगा. आणि, पाहा, माझे तुमच्याशी हे कर्तव्य आहे की, येथे उभे राहावे आणि तुम्हाला सत्य सुवार्ता प्रचार करावी. मी हे तुम्हाला देणे लागतो, कारण मी तुमच्यातील प्रत्येक जणाची मुखे, तरुण पुरुष आणि स्त्रीया, त्या पलीकडच्या तीरावर त्या दिशेत पाहू इच्छितो. तो फक्त एक श्वास आहे; जेथे तुम्ही आता आहात आणि तेथे. आता, ते बरोबर आहे. ते तेथे आहे.

229 आणि सर्व कृपेचा परमेश्वर, स्वर्गीय परमेश्वर, अपवित्र नव्हे, परंतु आदरयुक्त भावाने, "पित्या" त्या महान दिवशी जेव्हा आम्ही येथे सादर केले जाऊ आणि आमची पार्थीव शरीरे पुन्हा प्राप्त करु ह्यासाठी की आम्ही त्या देशातील द्राक्षे आणि फळे खाऊ शकू. "ते घरे बांधतील आणि त्यात दुसरे राहणार नाहीत. ते द्राक्षमळे लावतील आणि दुसरे ते खाणार नाही." समजले? एका मनुष्याने एक द्राक्षमळा लावला, त्याच्या पुत्राने तो घेतला, आणि नंतर त्याच्या पुत्राने तो—तो घेतला आणि त्याच्या. परंतु ह्या बाबतीत तसे होणार नाही. तो—तो लावील आणि तेथे राहील. समजले, ते बरोबर आहे. आपण तेथे सर्वकाळ राहू आणि त्या देशात, मी तुमच्यातील प्रत्येक जणास पाहो.

230 आणि मला माहीत आहे की, मी येथे त्रैक्यदेववादी सेवकांशीही बोलत आहे आणि माझ्या बंधूंनो, मी हे सांगत नाही. मी हे दुखविण्यासाठी सांगत नाही. मी सुध्दा त्रैक्यदेववादी आहे, मी त्रैक्यावर विश्वास ठेवतो, देवाचे तीन गुणविशेष (पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा) परंतु तीन देव नाही. समजले? मी विश्वास करतो की, तेथे तीन गुणविशेष आहेत. पूर्णतः,

मी तो माझ्या पूर्ण अंतःकरणाने करतो. “पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा.” परंतु ते तीन देव नाहीत. ते फक्त तीन गुणविषेश आहे...देवाचे तीन कार्यालय आहे. देव एकदा पितृत्वात राहीला. पुत्रत्वात राहीला आणि आता पवित्र आत्म्यात स्वतः आहे. तो तोच परमेश्वर तीन कार्यालयात आहे आणि...

231 आणि पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ही देवाची नावे नाहीत. देवाला एकच नाव आहे, आणि त्याचे नाव येशू आहे. बायबल म्हणते, “स्वर्गातील कुटूंबाला येशू म्हटले आहे, आणि पृथ्वीवरील कुटूंबाला येशू म्हटले आहे.” ते बरोबर आहे. म्हणून देवाला एक नाव, मानवी नाव होते. त्याला यहोवा यिरे, यहोवा राफा असे नाव होते. ते त्याची उपाध्या आहेत. परंतु त्याला एकच नाव होते, येशू! तो तोच आहे.

232 आणि खरोखरीचे, माझ्या बंधूंनो, जर तुम्ही माझ्यासह असहमत असाल, लक्षात ठेवा, मी—मी—मी कसेही करुन तुम्हाला तेथे भेटेन. समजले? मी—मी तुमच्याबरोबर तेथे असेन. आणि परमेश्वर तुम्हास आशीर्वाद देवो. आणि मी तुमच्यावर प्रेम करतो.

233 आणि आता माझी इच्छा आहे की, मंडळीने लक्षात ठेवावे, रविवारी सकाळी आपण येथून घेणार आहो. आणि मी प्रयत्न करणार आहे की, तुम्हाला दोन पेक्षा अधिक वेळ थांबवणार नाही. ह्यासाठी आपण दुपारची सभा घेऊ शकू. जर आपल्याला शक्य असले आणि जर मी केले. तर मी ह्या रात्र साडे—दहा पर्यंत. तुम्ही मला क्षमा कराल? मित्रांनो, आपल्याकडे जास्त समय राहिलेला नाही? प्रियांनो, मी तुम्हाला “प्रिय” म्हणतो, कारण तुम्ही आहात. तुम्हाला माहीत आहे काय? येथे एक शास्त्रवचन आहे. पौल म्हणाला, “तुम्हाविषयीची माझी आस्था (त्याची वधू) इश्वरप्रेरित आस्था आहे, मी तुमचे वाग्दान केले आहे.” तेथे तुम्ही आहात. ते तेच आहे. ते तेच आहे. “कारण मी तुमचे वाग्दान केले आहे, ख्रिस्ताशी वाग्दान केले आहे, शुध्द कुमारी म्हणून.”

234 आता, जर ते खरे होते, तर त्या दिवशी, तो म्हणाला...त्यांना म्हणाला, लोक मला म्हणाले, म्हणाला, “येशू तुझ्याकडे येईल, आणि तू आम्हस त्याला सादर करशील.” शुध्द कुमारी. “तू प्रचार केलेल्या वचनाद्वारे त्यांचा न्याय होईल.” आणि पाहा, जर मी तुम्हाला तेच शिकविले, जे पौलाने त्याच्या मंडळीला शिकवले, जर त्याचा समुह आपल्यात मिसळेल, कारण आपल्याकडे समान गोष्ट आहे. आमेन. आपण आपली मस्तके झुकविली असता, म्हणूया, “परमेश्वर तुम्हास आशीर्वाद देवो.” आता...?...आमचे प्रिय पाळक, भाऊ नेव्हील.

**दत्तकपणा** *2* MAR60-0518

(Adoption [2])

***दत्तकपण सत्र***

हा संदेश, भाऊ विल्यम मिरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, बुधवारी संध्याकाळी, 18 मे, 1960 साली, ब्रॅन्हम टॅबरनॅकल, जेफरसनविल येथे, इंडियाना, संयुक्त राज्य, अमेरिकेत प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेकोर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हे मराठी भाषांतर, व्हॉइस ऑफ गॉड रेकॉर्डिंग्स ह्यांनी छापले आहे आणि त्याचा वाटप करण्यात आला आहे

MARATHI

©2019 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## छपाईच्या हक्काची सूचना

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice of God Recodings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECODINGS
P.O. Box 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A
www.branham.org.